

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,नागपूर




## ई मासिक विद्यासंवाद


जुलै २०२३ | आवृत्ती-०१



मार्गदर्शक
**डॉ. सुभाष चौधरी**
कुलगुरु
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

**डॉ. संजय दुधे**
प्र-कुलगुरु
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

प्रकाशक
**डॉ. राजू हिवसे**
कुलसचिव
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

संपादक
**श्री. प्रेमदास वाडकर**
जनसंपर्क अधिकारी
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

मुद्रक
**श्री. प्रवीण गोतमारे**
प्रकाशन अधिकारी
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर








## अर्जुनी मोर येथे विद्यापीठाची फॅशन डिझायनिंग लॅब

-शताब्दी महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने 'चलो ग्राम की ओर' अभियानास सुरुवात

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ शताब्दी महोत्सवी वर्षात 'चलो ग्राम की ओर अभियान' राबवित आहे. गोंदिया जिल्ह्यातील अर्जुनी मोर येथे एस. एस. जयस्वाल महाविद्यालयात फॅशन डिझायनिंग लॅब स्थापित करून या अभियानाची शनिवार दिनांक १ जुलै २०२३ रोजी सुरुवात करण्यात आली.

**विद्यापीठ शताब्दी महोत्सवी वर्षातील महत्त्वकांक्षी प्रकल्प**

'रिच टू अनरीच्ड' ची सुरुवात समता फाऊंडेशन, मुंबईच्या सहाय्याने एस.एस. जयस्वाल महाविद्यालय, अर्जुनी मोर, गोंदिया येथे फॅशन डिझायनिंग लॅबच्या स्थापनेने झाली. या लॅबच्या उद्घाटनप्रसंगी विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, समता फाऊंडेशनचे संस्थापक आणि दूरदर्शी उद्योगपती श्री. पुरुषोत्तमजी अग्रवाल, एस. एस. जयस्वाल महाविद्यालय व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री. चितलांगेजी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहुर्ले, एमजीटी कौन्सिल सदस्य डॉ. डांगे, डॉ. प्रमोद खेडेकर, सायन्स अँड टेक्नॉलॉजीचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रकाश इटनकर, प्लेसमेंट अधिकारी डॉ. भूषण महाजन, आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाचे संचालक डॉ. निशिकांत राऊत यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. डॉ. चौधरी यांनी आपल्या उद्घाटनाच्या भाषणात प्रशिक्षित मानव संसाधनाचे उद्योजकांमध्ये रूपांतर करण्यासाठी किंवा विद्यार्थ्यांना स्वयंरोजगार सुरू करण्यासाठी क्लस्टरची स्थापना करावी, अशी सूचना केली. श्री. पुरुषोत्तमजी अग्रवाल यांनी अर्जुनी मोर सारख्या दुर्गम ठिकाणी संगणक शास्त्राचे प्रगत अभ्यासक्रमही सुरू करता येतील, असे जाहीर केले.

कम्प्यूटर सायन्ससोबत फॅशन डिझायनिंगची सांगड आश्चर्यचकित करू शकते आणि विद्यार्थ्यांनी क्षमता विकसित करण्यासाठी त्याचा लाभ घ्यावा, असेही ते म्हणाले. समता फाऊंडेशनला लॅब उभारण्याची परवानगी दिल्याबद्दल त्यांनी विद्यापीठ आणि महाविद्यालयाचे आभार मानले. समता फाऊंडेशनने विद्यार्थी, कर्मचारी आणि पालकांसाठी आयुष्मान आणि ई-श्रम कार्ड शिबिरासाठी मोफत सुविधा पुरविल्या. १ जुलै हा कृषी दिन / वृक्षरोपण दिवस म्हणून देखील साजरा केला जातो. या प्रसंगी सर्व मान्यवरांच्या हस्ते वृक्षरोपण देखील करण्यात आले.

**विद्यार्थ्यांना मिळेल प्रमाणपत्र**

लॅबमध्ये उपलब्ध संसाधनांचा वापर करून विद्यार्थ्यांना ड्रेस मेकिंग आणि फॅशन डिझायनिंग या क्षेत्रात विनामूल्य प्रशिक्षण दिले जाणार आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या आजीवन शिक्षण व विस्तार विभागामार्फत हा कार्यक्रम यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र दिले जाणार आहे. या लॅबच्या उद्घाटनासोबतच समता फाऊंडेशनतर्फे पालक व स्थानिक लोकांसाठी मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले.



मा. राज्यपाल
**श्री. रमेश बैस**



मा. कुलगुरु
**डॉ. सुभाष चौधरी**



मा. प्र-कुलगुरु
**डॉ. संजय दुधे**



मा. कुलसचिव
**डॉ. राजू हिवसे**









## छत्रपतींच्या आदर्श ज्ञानाने परिपूर्ण पिढी तयार व्हावी

* केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री श्री. नितीन गडकरी यांचे प्रतिपादन

* छत्रपती शिवाजी महाराजांचा सिंहासनारूढ पुतळा भूमिपूजन समारंभ

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ हे ज्ञानाचे मंदिर आहे. ज्ञानाच्या मंदिरात आरूढ छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यामुळे विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळेल. छत्रपती शिवाजी महाराज यांचे आदर्श, सिद्धांत व नीती आदी ज्ञानाने परिपूर्ण पिढी तयार होईल, असा आशावाद केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री श्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या महाराज बाग स्थित छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसरात छत्रपती शिवाजी महाराज यांचा सिंहासनारूढ ५१ फुट उंच असा भव्य पुतळा उभारणीचा भूमिपूजन समारंभ रविवार, दिनांक १८ जून २०२३ रोजी सकाळी पार पडला. त्यानंतर वसंतराव देशपांडे सभागृहात आयोजित कार्यक्रमात श्री. गडकरी मार्गदर्शन करीत होते.

केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री श्री नितीन गडकरी, महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, श्रीमंत प्रिन्स शिवाजी राजे भोसले (तंजावर), माजी मंत्री श्री. अनिल देशमुख, विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, माजी आमदार श्री. जोगेंद्र कवाडे, स्मारक समितीचे अध्यक्ष डॉ. श्रीमंत राजे मुधोजी भोसले, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, श्री. बबनराव तायवाडे, श्री. शेखर सावरबांधे, श्री. मंगेश डुके यांनी कुदळ मारून भूमिपूजन केले. स्मारक समितीचे सचिव श्री. मंगेश डुके यांच्या हस्ते सहपत्नीक पुतळा स्थळावर विधिवत होमहवन व पूजन पार पडले. त्यानंतर वसंतराव देशपांडे सभागृहात आयोजित कार्यक्रमाला मंचावर केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी, आमदार श्री. अभिजीत वंजारी, आमदार श्री मोहन मते, आमदार प्रवीण दटके, श्रीमंत प्रिन्स शिवाजी राजे भोसले (तंजावर), माजी मंत्री श्री. अनिल देशमुख, विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, माजी आमदार श्री. जोगेंद्र कवाडे, स्मारक समितीचे अध्यक्ष डॉ. श्रीमंत राजे मुधोजी भोसले, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, श्री. बबनराव तायवाडे, समितीचे उपाध्यक्ष श्री. शेखर सावरबांधे, श्री. प्रशांत पवार, समितीचे सचिव श्री. मंगेश डुके, सहसचिव डॉ. प्रशांत कडू, कोषाध्यक्ष श्री. विजयकुमार शिंदे, विद्यापीठाचे विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. मंगेश पाठक, प्राचार्य डॉ. प्रवीणा खोब्रागडे उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराज आपले दैवत असल्याचे सांगत आदर्श राजा, आदर्श पिता, आदर्श शासक असे विविध त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू असल्याचे श्री. गडकरी म्हणाले. आई-वडिलांपेक्षा देखील छत्रपती अधिक प्रिय आहे. कोणतीही कामे त्यांना स्मरण करून करतो. जीवनात त्यांची मोठी प्रेरणा मिळाली आहे. शिवशाही आणायची आहे, असे आपण म्हणतो. रामराज्य जसा प्रचलित शब्द आहे, त्याचप्रमाणे शिवशाही देखील प्रचलित आहे. शिवशाही म्हणजेच आदर्श राज्य असल्याचे श्री. गडकरी म्हणाले. छत्रपतींच्या विचारांच्या अनुरूप भविष्यातील पिढी घडविण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. विद्यापीठात भव्य ऑडिटोरियम आणि कन्व्हेन्शन सेंटर बांधले जाणार आहे. त्याच ठिकाणी शिवाजी महाराजांवरील लाईट शो करता येईल असे ते म्हणाले. सोबतच राष्ट्रसंतांनी ग्रामगीतेत दिलेल्या जीवनाच्या सार याबाबत त्यांनी माहिती दिली. ग्रामगीता, ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा, संत गजानन विजयग्रंथ हे डिजिटल स्वरूपात उपलब्ध करून देणार असल्याचे श्री. गडकरी म्हणाले. सोबतच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्यावर चित्रपट निर्माण करण्याचा प्रयत्न असल्याचे ते म्हणाले यातून तरुण पिढीला इतिहासाबाबत माहिती होईल. लोक सहभागातून होत असलेल्या भव्य पुतळ्याला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी ५ लाख रुपयांची मदत घोषित केली. नागरिकांनी देखील लोक सहभाग द्यावा असे ते म्हणाले. यावेळी अभिनेता रजनीकांत यांच्या चेन्नई येथील घरी गेले असता शिवाजी महाराजांचा मोठा फोटो दर्शनी भागात असल्याचा किस्सा त्यांनी सांगितला.

यावेळी स्मारक समितीचे अध्यक्ष डॉ. श्रीमंत राजे मुधोजी भोसले यांनी मनोगत व्यक्त करताना पुतळ्या विषयी माहिती दिली. फक्त पुतळाच ३२ फुटाचा असून चबुतरा, छत्र असा एकूण ५१ फुटाचा भव्य पुतळा उभारल्या जात, असल्याचे ते म्हणाले. याच ठिकाणी संग्रहालय तसेच ग्रंथालय उभारण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक समितीचे सचिव मंगेश डुके यांनी केले. प्रास्ताविकातून त्यांनी पुतळा बसविण्याच्या घडामोडीबाबत माहिती दिली. या कार्यक्रमात शिल्पकार सोनल कोहाड, संतोष कुर्वे, गौरव डुबेवार यांचा सत्कार करण्यात आला.

### इंग्रज नसते तर देशावर मराठ्यांचे राज्य - शिवाजी राजे

इंग्रज आले नसते तर भारतावर मराठ्यांचे राज्य असते असे तंजावरचे प्रिन्स शिवाजी राजे भोसले यांनी बोलताना सांगितले. छत्रपती शिवाजी महाराज नसते तर भारत कसा असता याची कल्पना आपण करू शकतो. महाराजांनी आपणास स्वराज्याचा मंत्र दिला आहे. पानिपतच्या युद्धानंतर देखील मराठ्यांनी त्यांचे अस्तित्व कायम ठेवले. मराठ्यांचे राज्य कसे होते याबाबत कागदपत्रे उपलब्ध आहेत. धर्म, संस्कृतीचे रक्षण करण्याची जबाबदारी आपणावर असल्याचे ते म्हणाले.

### युगपुरुष छत्रपती शिवाजी -अनिल देशमुख

छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा नागपूरचे आकर्षण राहणार आहे. रयतेला लेकरांप्रमाणे वागविणारे छत्रपती शिवाजी महाराज युगपुरुष होते असे माजी मंत्री अनिल देशमुख म्हणाले. शिवाजी महाराज यांनी उमेद बाळगून सर्वांना सोबत घेऊन स्वराज्याची स्थापना केली. महाराजांचा हाच आदर्श सर्वांनी कृतीत उतरण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.







### कृषी महत्वपूर्ण क्षेत्र - डॉ. संजय दुधे

-राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात कृषी दिन कार्यक्रम

कृषी हे महत्त्वपूर्ण क्षेत्र असल्याचे प्रतिपादन माननीय प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात गणित विभागातील रामानुजन सभागृहात शनिवार, दिनांक १ जुलै २०२३ रोजी कृषी दिन कार्यक्रम पार पडला. यावेळी डॉ. दुधे मार्गदर्शन करीत होते.

महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री, हरितक्रांतीचे प्रणेते, शेतकयांचे कैवारी वसंतराव नाईक यांची जयंती कृषी दिन म्हणून साजरी करण्यात येत असल्याचे डॉ. दुधे यांनी सांगितले. कोरोना संकट काळात संपूर्ण क्षेत्र लॉकडाऊन होते. त्यावेळी देखील केवळ कृषी क्षेत्रचं सुरू होते, असे ते म्हणाले. विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या मार्गदर्शनात कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे हे होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून राज्यपाल नामित अधिसभा सदस्य डॉ. विजय इलोरकर, कुलसचिव डॉ. राजू हिवसे आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

राज्यपाल नामित अधिसभा सदस्य डॉ. विजय इलोरकर यांनी विद्यापीठामध्ये कृषी दिन कार्यक्रम साजरा व्हावा म्हणून अधिसभेत प्रस्ताव मांडला होता. अधिसभा व नंतर व्यवस्थापन परिषदेने यास मान्यता दिली. सोबतच या कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून डॉ. विजय इलोरकर हे कार्य सांभाळत आहे. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना डॉ. विजय इलोरकर यांनी कृषी दिन साजरा करण्यामागील पार्श्वभूमी विषद केली. जल, जमीन, जंगल व कृषी याबाबत माहिती दिली. निसर्गाचे संतुलन राखत शेती करण्याबाबत त्यांनी प्रास्ताविक करताना माहिती दिली. कार्यक्रमाचे संचालन डॉ. अमृता इंदूरकर यांनी केले तर आभार विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी मानले. कार्यक्रमाला वित्त व लेखा अधिकारी डॉ. हरीश पालीवाल, मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. सोपानदेव पिसे, एलआयटी संचालक डॉ. राजू मानकर, उपकुलसचिव प्रदीप बिनीवाले, प्रवीण गोतमारे, गणित विभाग प्रमुख डॉ. गणेश केदार यांच्यासह प्राधिकारिणी सदस्य, विविध शैक्षणिक विभागांचे विभाग प्रमुख, शिक्षक, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.




### छत्रपती शिवाजी महाराज यांचा जगातील सर्वात मोठा सिंहासनारूढ पुतळा उभारणार

-राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समिती लोकसहभागातून साकारणार पुतळा

छत्रपती शिवाजी महाराज यांचा जगातील सर्वात मोठा सिंहासनारूढ भव्य पुतळा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या महाराजबाग स्थित जागेवर उभारला जाणार आहे. विद्यापीठ शताब्दी महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समिती लोकसहभागातून हा भव्य पुतळा साकारणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य पुतळ्याच्या स्थापनेबाबत माहिती पत्रक सोमवार, दिनांक ८ मे २०२३ रोजी माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या हस्ते कुलगुरू कक्षात प्रकाशित करण्यात आले.

यावेळी प्र- कुलगुरू डॉ. संजय दुधे, स्मारक समितीचे अध्यक्ष डॉ. मुधोजी राजे भोसले, उपाध्यक्ष शेखर सावरबांधे, सचिव मंगेश डुके, सहसचिव तथा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू, कोषाध्यक्ष विजय शिंदे, प्राचार्या डॉ. प्रविणा खोब्रागडे व इतर उपस्थित होते. विद्यापीठाच्या स्थापनेला यावर्षी १०० वर्षे पूर्ण होत असून त्याचे औचित्य साधून या शताब्दी वर्षी छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समिती लोकसहभागातून विद्यापीठाच्या महाराजबाग स्थित जागेवर छत्रपती शिवाजी महाराजांचा सिंहासनारूढ भव्य पुतळा उभारत आहे. हा पुतळा ब्रांझ या धातूचा असून त्याची रीतसर परवानगी महाराष्ट्र शासनाच्या कला व संचालनालय विभागाने दिली आहे. जगातील सर्वात मोठा सिंहासनारूढ असा हा पुतळा राहणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक हा भारतासह जगात मानवतावादी लोकशाही व्यवस्था निर्माण करण्याचा सर्वात पहिला यशस्वी प्रयत्न आहे. त्यामुळे राज्याभिषेकाची आठवण देणारा छत्रपती शिवाजी महाराजांचा सिंहासनारूढ पुतळा हा जनतेच्या मनात मानवतावादी दृष्टिकोन जागवण्यासाठी प्रेरक ठरणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांचा राजधर्म आणि त्यांची प्रजाहितवादी दृष्टी आजही प्रेरणादायी आणि लक्षवेधी ठरणारी आहे. त्यांचा आदर्श आजही महाराष्ट्रातील मनामनात कायम आहे. विद्यापीठातून शिक्षण घेऊन बाहेर निघणारा विद्यार्थी हा केवळ शैक्षणिक पदवी घेऊन जाणारा नसावा तर छत्रपती शिवाजी महाराजांची कल्पकता, विजयश्री, कुशल प्रशासक, राष्ट्रप्रेम, धार्मिक सहिष्णुता, नैतिकता ही मूल्य घेऊन जाणारा असावा. केवळ याच एका उद्देशाने छत्रपती शिवाजी महाराजांचा सिंहासनारूढ पूर्ण पुतळा उभारण्यात येत आहे. महाराजांचा हा पुतळा छत्रपती शिवाजी स्मारक समिती राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाद्वारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाच्या मध्यवर्ती प्रशासकीय परिसरात लोक सहभागातून उभारण्यात येणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समितीच्या माध्यमातून विद्यार्थी, शिक्षक, इतिहास संशोधक, अभ्यासक व नागरिकांना प्रगत शिक्षण केंद्र उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या शिक्षण केंद्रांमध्ये शिक्षणतज्ञ, संशोधक, विद्यार्थी यांना शिवाजी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर व कार्यावर अभ्यास करण्याची संधी प्राप्त होईल. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची कल्पना व विचार समजून घेण्यासाठी आणि त्यावरील संशोधन अधिक प्रगल्भ करण्यासाठी स्मारक समिती साधने उपलब्ध करून देणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यामुळे भारतासह जगामध्ये सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक जीवनावरील पडलेल्या प्रभावाचे संशोधन करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे समाजातील उपेक्षित पीडित मागासवर्गीय व समाजातील दुर्बल घटकांच्या जैविक पैलू बद्दल संशोधन व अभ्यास करण्यासाठी संशोधकांना शिष्यवृत्ती व संशोधन साधनांची पूर्तता करण्यासाठी या स्मारकाचे निर्माण करण्यात येत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांना केंद्रवर्ती ठेवून त्यांच्या कारकीर्दीच्या आधी व तद्नंतर ज्या- ज्या महापुरुषांनी संतांनी लोकनेत्यांनी कार्य केले आहे. त्याबद्दल सुद्धा संशोधन व्याख्यान परिसंवाद इत्यादी आयोजित करून त्यावर आधारित पुस्तके प्रकाशित करण्याचे कार्य स्मारक समिती करणार आहे.

## असा असेल पुतळा

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाच्या चबुतऱ्याची लांबी २० फूट, रुंदी १५ फूट असून उंची ९ फूट आहे. सिंहासनारूढ पुतळ्याची उंची ३२ फूट असून त्यावरील छत्र ७ फुट आहे. ब्रांझ धातूने बनविण्यात येणाऱ्या पुतळ्याचे वजन १०,००० किलोग्राम असेल. पुतळा मूर्तिकार सोनल कोहाड साकारणार आहे.

## मॅजिक स्टोन कंपनीत चार विद्यार्थ्यांची निवड

- विद्यापीठ रोजगार व प्रशिक्षण विभागात मुलाखती





राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या रोजगार व प्रशिक्षण विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या प्लेसमेंट ड्राईव्हमध्ये चार विद्यार्थ्यांची पुणे येथील मॅजिक स्टोन कंपनीत निवड करण्यात आली आहे. महाराज बाग स्थित दीक्षांत सभागृहात बुधवार, दिनांक ५ जुलै २०२३ रोजी हा प्लेसमेंट ड्राईव्ह पार पडला.

पुणे येथील मॅजिक स्टोन प्राप कन्सल्टंट एलएलपी ही रियल इस्टेट मार्केटिंग मधील मोठी कंपनी आहे. या उद्योगामध्ये कंपनीचे मजबूत आणि व्यापक असे जाळे पसरले आहे. विकासक, गुंतवणूकदार आणि एजंट करिता नाविन्यपूर्ण मार्केटिंग सोल्युशन देण्याचे काम कंपनीकडून केले जाते. याकरिता हा प्लेसमेंट ड्राईव्ह घेण्यात आला. दीक्षांत सभागृहात कंपनीचे फाउंडर निलेश देशमुख, कंपनीचे हितेश मोळके, प्रोजेक्ट मॅनेजर गुरुप्रीत सिंग, एचआर मॅनेजर स्वाती यांच्याकडून ही मुलाखत प्रक्रिया राबविण्यात आली. यावेळी विद्यापीठाचे प्लेसमेंट ऑफिसर डॉ. भूषण महाजन, श्रीमती मनोरमाबाई मुंडले कॉलेज ऑफ आर्किटेक्चर येथील प्लेसमेंट ऑफिसर डॉ. रश्मी तिजारे यांची उपस्थिती होती. मॅजिक स्टोन कंपनीकडून रिलेशनशिप मॅनेजर, सीनियर प्री- सेल्स एक्झिक्युटिव्ह, प्री- सेल्स एक्झिक्युटिव्ह या पदाकरिता या मुलाखतीचे आयोजन करण्यात आले. या पदाकरिता स्थापत्य अभियंता, बीआर्च आणि एमबीए मार्केटिंग अशी शैक्षणिक अहर्ता असलेल्या विद्यार्थ्यांना मुलाखतीकरिता बोलाविण्यात आले होते. या पदांकरिता जवळपास २०० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. प्रत्यक्ष ३५ विद्यार्थी मुलाखतीकरिता उपस्थित होते. मुलाखत प्रक्रिया राबविल्यानंतर ४ विद्यार्थ्यांची कंपनीकडून निवड करण्यात आली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना वार्षिक ३.५ लाख व अधिक भत्ता असे पॅकेज मिळणार आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र- कुलगुरू डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी अभिनंदन केले आहे.





**नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अधिक लवचिक**

* सुकाणू समिती सदस्य डॉ. मुरलीधर चांदेकर यांचे प्रतिपादन

* विद्यापीठात नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर चर्चासत्र

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अधिक सुटसुटीत तसेच लवचिक असल्याचे प्रतिपादन माजी कुलगुरू तथा पदव्यूत्तर अभ्यासक्रम सुकाणू समिती सदस्य डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ अंतर्गत स्वायत्त महाविद्यालयांमध्ये पदवी व पदव्यूत्तर तसेच संलग्न महाविद्यालयांमध्ये पदव्यूत्तर अभ्यासक्रमांना एनईपी लागू करण्यात आली आहे. एनईपी २०२० लागू करताना येणाऱ्या अडचणी समजून घेण्याकरिता जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात गुरुवार, दिनांक ६ जुलै २०२३ रोजी चर्चासत्र पार पडले. या कार्यशाळेत डॉ. चांदेकर मार्गदर्शन करीत होते. विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी चर्चासत्राची अध्यक्षता केली. यावेळी वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. संजय कवीश्वर, मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा सह अधिष्ठाता डॉ. प्रकाश इटनकर आदी उपस्थित होते.

कार्यशाळेला मार्गदर्शन करताना सुकाणू समिती सदस्य डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण लागू करण्यात मागील पार्श्वभूमी विशद केली. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण शिकण्यावर आधारित आहे . तर अध्यापनावर आधारित नसल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. माशेलकर समिती तसेच चार उपसमितीने दिलेला अहवाल स्वीकारला. केवळ अहवालानुसार एनईपीवर अंमल करणे शक्य नव्हते. अहवालानुसार अभ्यासक्रम, परीक्षा व मूल्यांकन धोरण तयार करण्याकरिता सुकाणू समितीला अधिकार दिले. शैक्षणिक सत्र सुरू होण्यास कमी कालावधी असल्याने पदवी अभ्यासक्रमांना एनईपी लागू करणे शक्य झाले नाही. मात्र, आगामी २०२३-२४ या शैक्षणिक सत्रापासून स्वायत्त महाविद्यालयात पदवी व पदव्युत्तर, विद्यापीठाचे विभाग तसेच संलग्नित महाविद्यालयातील पदव्यूत्तर अभ्यासक्रमांना एनईपी लागू करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. सर्व प्राचार्यांना नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाबाबत माहिती व्हावी तसेच धोरण लागू करताना येणाऱ्या अडचणी, समस्या जाणून घेण्याकरिता या कार्यशाळेचे आयोजन केल्याचे डॉ. चांदेकर यांनी सांगितले. एनईपीत पदवी अभ्यासक्रमात मेजर व मायनर असे विषय आहे. मात्र, पदव्युत्तर अभ्यासक्रमामध्ये संशोधनावर अधिक भर दिला आहे. स्वायत्त महाविद्यालयांना अभ्यासक्रम ते परीक्षेबाबत संपूर्ण स्वायत्तता दिली आहे. एनईपी लागू करताना अडचणी येणार आहे. सहा अडचणींबाबत डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी स्वायत्त महाविद्यालयांच्या प्राचार्यांपासून माहिती घेतली. यामध्ये प्राधिकरणाने नवीन अभ्यासक्रमास मान्यता दिली का?, सहा व्हर्टिकल तसेच बास्केट तयार केले का ?, प्रवेश प्रक्रिया सुरू झाली का ?, वर्क लोड कसा असेल?, मेजर व मायनर कॉम्बिनेशन केले का? अन्य आदी बाबींवर डॉ. चांदेकर यांनी प्रकाश टाकला. यावेळी ओजेटी (ऑन जॉब ट्रेनिंग), एसआयपी (स्किल इंडक्शन प्रोग्राम), फिल्ड प्रोजेक्ट, रिसर्च प्रोजेक्ट, इंटर्नशिप आधी याबाबत महाविद्यालयांनी प्रस्ताव तयार करावा तसे ते म्हणाले. एनईपी लागू करण्याबाबत अनेक बारीकसारीक बाबींचा समावेश असलेली गाईडलाईन लवकरच काढली जाईल, असे चांदेकर म्हणाले. यावेळी त्यांनी विविध स्वायत्त महाविद्यालयांच्या प्राचार्यांकडून येणाऱ्या समस्या अडचणींबाबत माहिती जाणून घेतली. यावेळी अधिष्ठाता डॉ. संजय कवीश्वर यांनी एनईपी बाबत असलेल्या शंकांचे निरसन केले. उपस्थितांचे आभार मानव विज्ञान विद्या शाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांनी मानले. या चर्चेत विभाग प्रमुख डॉ. ओ.पी. चिमणकर, डॉ. पायल ठावरे, प्राचार्य डॉ. विलास बोडके, डॉ. स्वाती कठाळे यांच्यासह अन्य प्राचार्यांनी सहभाग घेतला.

### ४ स्वायत्त, ४८ विभाग तर ११० महाविद्यालयांत एनईपी

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ अंतर्गत येत असलेले ४ स्वायत्त महाविद्यालय, विद्यापीठाचे ४८ पदव्यूत्तर विभाग त्याचप्रमाणे पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संलग्नित ११० महाविद्यालयांमध्ये एनईपी लागू केली जाणार आहे. ४ स्वायत्त महाविद्यालयामध्ये पदव्यूत्तर पदवी तसेच पदवी अभ्यासक्रमाला देखील एनईपी नुसार प्रवेश मिळणार आहे.**

### एनईपी विद्यार्थी केंद्रित - डॉ. चौधरी

**नवीन शैक्षणिक धोरणावर सर्वांना अंमल करावयाचा आहे. याबाबत या कार्यशाळेतून माहिती देण्यात आली. महाविद्यालयांना येणाऱ्या अडचणी तसेच समस्या ऐकल्या जाणार आहेत. ही निरंतर प्रक्रिया असून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे विद्यार्थी केंद्रित कसे असते याकडे लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.**







## अधिसभा सदस्यांचे विद्यापीठाला आकार देण्याचे कार्य

* अधिसभा सदस्य डॉ. राजेश भोयर यांचे प्रतिपादन

* नवनियुक्त अधिसभा सदस्यांची विद्यापीठात कार्यशाळा




संपूर्ण विद्यापीठाला आकार देण्याचे, दिशा देण्याचे महत्त्वपूर्ण काम कायद्याने अधिसभा (सिनेट) सदस्यांना दिले आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ अधिसभा सदस्य डॉ. राजेश भोयर यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात नवनियुक्त अधिसभा सदस्यांची कार्यशाळा शुक्रवार, दिनांक ७ जुलै २०२३ रोजी पार पडली. या कार्यशाळेत नवनियुक्त सदस्यांना मार्गदर्शन करताना डॉ. भोयर बोलत होते.

कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी होते. मार्गदर्शक म्हणून ज्येष्ठ अधिसभा सदस्य डॉ. राजेश भोयर, माजी अधिसभा सदस्य डॉ. अनिल ढगे, तर प्रमुख अतिथी म्हणून प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे उपस्थित होते. कार्यशाळेत डॉ. भोयर यांनी 'अधिसभेची कार्यप्रणाली व सदस्यांचे दायित्व' या विषयावर मार्गदर्शन करताना नवीन सदस्यांना सभागृहातील कार्यपद्धतीची विविधांगी माहिती दिली. अधिसभेमध्ये विविध संघटनेचे विविध विचारांचे सदस्य निवडून वा नामनिर्देशनाने येतात. सभागृहातील सर्व सदस्य एकसंघ झाल्यास दबाव गट तयार होतो. या दबाव गटापुढे प्रशासनाला झुकावे लागते, असे ते म्हणाले. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ त्यांनी उलगडून सांगितला. अधिसभेची संपूर्ण रचना, त्याचप्रमाणे कायद्यातील कलम नुसार सदस्यांना देण्यात आलेली जबाबदारी याबाबत त्यांनी माहिती दिली. सभागृहात होत असलेल्या कामकाजात तसेच चर्चेमध्ये सहभाग घ्यायचा असेल तर सातत्याने कायद्याचे वाचन केले पाहिजे. विद्यापीठ कायद्यासोबत अन्य नियमांची देखील माहिती असणे गरजेचे आहे. कायद्याला काय अपेक्षित आहे, हे जोपर्यंत कळणार नाही, तोपर्यंत सदस्य पूर्णपणे कामकाजात सहभागी होऊ शकत नाही. शिक्षण हे केंद्र सरकारच्या समवर्ती सूचित असल्याने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या रेगुलेशन्सला देखील कायद्याचा दर्जा मिळतो, असे डॉ. भोयर म्हणाले. प्रत्येक अधिसभा सदस्य हा शिक्षण तज्ञ असतो, विद्यापीठाचे आर्थिक अंदाजपत्रक तयार करण्याचे अधिकार अधिसभा सदस्यांना आहे. सोबतच परिनियमांचे शस्त्र दिले असून कामे पूर्ण व्हावी म्हणून कार्यप्रणाली देखील निश्चित केली आहे. या सोबतच पॉईंट ऑफ ऑर्डर, पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन, परिनियम, रुल्स, रेगुलेशन्स, ऑर्डिनन्स परिपत्रक, पत्रक, प्रश्न विचारण्याचा अधिकार, प्रश्न कसा विचारावा यासह विविध बारकावे डॉ. भोयर यांनी नवीन सदस्यांना सांगितले. कार्यशाळेचे प्रास्ताविक करताना कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी यामागील भूमिका विषद केली. नवीन कायद्यानुसार बरेच बदल झाले आहेत. नवीन सदस्यांना सुधारित नियम व तरतुदींचा अभ्यास असावा म्हणून कार्यशाळेचे आयोजन असल्याचे ते म्हणाले. कार्यशाळेचे संचालन करीत आभार डॉ. अमृता इंदूरकर यांनी मानले. कार्यशाळेला मोठ्या संख्येने अधिसभा सदस्य उपस्थित होते.

### नियमांवर उत्तम पकड आवश्यक - डॉ. अनिल ढगे

अधिकार व मर्यादा यांचा योग्य वापर केला तर सदस्य म्हणून उत्तम भूमिका बजावू शकता. त्याकरिता नियमांवर तुमची उत्तम पकड आवश्यक आहे असे प्रतिपादन माजी अधिसभा सदस्य डॉ. अनिल ढगे यांनी केले. विद्यापीठाचे विविध प्राधिकरण, नियम, परिनियम याबाबत त्यांनी माहिती दिली.केंद्रीय स्वायत्त संस्था, राज्य तसेच विद्यापीठाच्या रेगुलेशन्स मध्ये






## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात वृक्षारोपण
### -राष्ट्रीय महामार्ग विभाग व विद्यापीठाचा पुढाकार

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या शैक्षणिक परिसरात सोमवार, दिनांक १० जुलै २०२३ रोजी सकाळी वृक्षारोपण कार्यक्रम पार पडला. राष्ट्रीय महामार्ग विभाग नागपूर व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमानाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, राष्ट्रीय महामार्ग विभागाचे कार्यकारी अभियंता नरेश बोरकर, विद्यापीठाचे वित्त व लेखा अधिकारी डॉ. हरिष पालीवाल, मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा सह अधिष्ठाता डॉ. प्रकाश इटनकर यांच्या हस्ते यावेळी वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी विद्यापीठाचे उपकुलसचिव श्री. प्रदीप बिनीवाले, उपकुलसचिव (उद्यान विभा श्री.प्रवीण गोतमारे, अधिसभा सदस्य याकुब शेख, राष्ट्रीय महामार्ग विभागाचे शाखा अभियंता उमेर इनामदार यांच्यासह अन्य उपस्थित होते.

राष्ट्रीय महामार्ग विभाग नागपूर यांच्या वतीने विद्यापीठाच्या परिसरात एकूण १५०० वृक्षांची लागवड केली जाणार आहे. विद्यापीठ परिसरात अमलतास, कडूनिंब, वड, पिंपळ, करंज, प्लेटोफोरम आदी विविध जातींच्या वृक्षांची यावेळी लागवड करण्यात आली. रस्त्याच्या दुतर्फावर तसेच सुरक्षा भिंतीच्या सभोवताल ही वृक्ष लागवड केली जाणार आहे. नागपूर - अमरावती मार्गावर उड्डाणपूल तसेच सिमेंट कॉंक्रीटीकरण रस्त्याची निर्मिती केली जात आहे. विकास कामांमध्ये बाधित झालेले वृक्ष तोडण्यात आल्याने त्याची भरपाई म्हणून राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या वतीने मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण केले जात आहे. त्यानुसार विद्यापीठ परिसरात

या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाकरिता पुणे येथील टी अ‍ॅण्ड टी इन्फ्रा तसेच सावन इन्फ्रा नागपूर आदी दोन कंत्राटदार कंपन्यांनी सहकार्य केले. या कार्यक्रमाला विद्यापीठाचे कर्मचारी, विभागाचे अधिकारी, कंत्राटदार कंपन्यांचे कर्मचारी उपस्थित होते.



## लक्ष्मीनारायण तंत्र संस्थेला यूजीसीचा स्वायत्त दर्जा
### -राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाला पत्र प्राप्त

लक्ष्मीनारायण तंत्र संस्थेला (एलआयटी) दिल्ली येथील विद्यापीठ अनुदान आयोगाने स्वायत्त दर्जा प्रदान केला आहे. याबाबत पत्र देत विद्यापीठ अनुदान आयोगाने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूरला कळविले आहे. विद्यापीठ अनुदान आयोगा (यूजीसी) ने स्वायत्त दर्जा प्रदान केल्याने एलआयटीला आणखी एक बहुमान प्राप्त झाला आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्न लक्ष्मीनारायण तंत्र संस्थेने स्वायत्त दर्जा प्राप्त व्हावा म्हणून दिल्ली येथील विद्यापीठ अनुदान आयोगाकडे प्रस्ताव पाठविला होता. विद्यापीठ अनुदान आयोगाने २७ जून २०२३ रोजी झालेल्या बैठकीत स्वायत्त महाविद्यालयांबाबत असलेल्या स्थायी समितीने केलेल्या शिफारसी मान्य केल्या. स्थायी समितीने केलेल्या शिफारसीनुसार दहा वर्षांच्या कालावधी करिता यूजीसी कलम ७.५ (महाविद्यालयांना स्वायत्त दर्जा प्रदान करणे आणि स्वायत्त महाविद्यालयांमध्ये दर्जा राखण्यासाठी उपाययोजना) अंतर्गत २०२३-२४ ते २०३२-२०३३ या शैक्षणिक सत्राकरिता ही स्वायत्तता प्रदान करण्यात आली आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (महाविद्यालयांना स्वायत्त दर्जा प्रदान करणे आणि स्वायत्त महाविद्यालयांमध्ये दर्जा राखण्यासाठी उपाययोजना) नियम २०२३ अंतर्गत एलआयटीला स्वायत्त दर्जा देण्याबाबत ३० दिवसांच्या आत आवश्यक अधिसूचना काढण्याची विनंती या पत्राद्वारे विद्यापीठाला करण्यात आली आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाचे स्वायत्त महाविद्यालयांसाठी असलेल्या नियमांच्या सर्व तरतुदींचे एलआयटीला पालन करावे लागणार आहेत. याबाबत सर्व नियमावली यूजीसीच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. नियमांमध्ये वर्णन केलेल्या अटी आणि शर्तींचे पालन न केल्यास यूजीसी नियमावलीच्या कलम १३ नुसार कारवाई देखील केल्या जाऊ शकते. सोबतच स्वायत्तता कालावधी पूर्ण होण्याच्या किमान ३ महिने आधी पुन्हा स्वायत्त दर्जाच्या विस्तारासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाकडे अर्ज सादर करणे आवश्यक असल्याचे पत्रात नमूद आहे.

## एलआयटीच्या दोन विभागांना एनबीएची मान्यता
### - राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाला बहुमान

मध्य भारतातील उच्च प्रतिष्ठित शिक्षण संस्था असलेली लक्ष्मीनारायण इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (एलआयटी) आता वॉशिंग्टन एकॉर्ड अंतर्गत आंतरराष्ट्रीय मान्यताप्राप्त झाले आहे. एलआयटी मधील दोन विभागांना राष्ट्रीय मान्यता मंडळाकडून (एनबीए) मान्यता मिळाली आहे. बीटेकच्या रासायनिक अभियांत्रिकी आणि पेट्रोकेमिकल तंत्रज्ञान या २ अभ्यासक्रमांना ३ वर्षांसाठी मान्यता मिळाली आहे. नॅक अ प्लस व एनबीए मानांकनाने एलआयटी मान्यताप्राप्त संस्था म्हणून नावारूपास आली आहे. त्यामुळे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाला बहुमान प्राप्त झाला आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या लक्ष्मीनारायण तंत्र संस्थेला प्रतिष्ठित राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृती परिषदेने (NAAC) यापूर्वीच A+ मानांकन दिले आहे. एनबीए मानांकन प्राप्त झाल्याने भारतातील पाच टक्केत असलेल्या उच्च शिक्षण संस्थांमध्ये एलआयटीचा समावेश आहे. ऑगस्ट २०२२ मध्ये 4-पॉइंट स्केलवर 3.48 चा ग्रेड पॉइंट सरासरी (CGPA) इतकी श्रेणी संस्थेने प्राप्त केली आहे. नॅक मानांकन नंतर एका वर्षाच्या कालावधीतच संस्थेच्या केमिकल इंजिनिअरिंग आणि पेट्रोकेमिकल टेक्नॉलॉजी या दोन विभागांनी राष्ट्रीय मान्यता मंडळ (एनबीए) कडे मान्यतेसाठी अर्ज सादर केले होते. एनबीए तज्ज्ञ पथकाने ६ ते ८ मे २०२३ दरम्यान भेट देत संस्थेची पाहणी केली. या तज्ज्ञ पथकामध्ये डॉ. सुरेश गर्ग, डॉ. टी. के. राधाकृष्णन आणि डॉ. बी. एन. राय यांच्या पथकाने रासायनिक अभियांत्रिकी विभाग तर डॉ. अनुपमा शर्मा आणि डॉ. आनंद किशोर कोला यांच्या पथकाने पेट्रोकेमिकल तंत्रज्ञान विभागाचे मूल्यांकन केले.




## इव्हेंटिस रिसर्च कंपनी करणार २२ विद्यार्थ्यांची निवड
### - राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात प्लेसमेंट ड्राईव्ह

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात बुटीबोरी येथील इव्हेंटिस रिसर्च को. प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचा प्लेसमेंट ड्राईव्ह बुधवार दिनांक १२ जुलै २०२३ रोजी पार पडला. महाराज बाग स्थित विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात आयोजित ड्राईव्हमध्ये एकूण २२ विद्यार्थ्यांची कंपनीकडून निवड केली जाणार आहे. माननीय प्र- कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी भेट देत विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविला. यावेळी रोजगार व प्रशिक्षण अधिकारी डॉ. भूषण महाजन उपस्थित होते.

बुटीबोरी स्थित इव्हेंटिस रिसर्च को. प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीकडून ट्रेनी आर ॲंड डी तसेच एडीएल या पदांकरिता दीक्षांत सभागृहात प्लेसमेंट ड्राईव्ह आयोजित करण्यात आला. कंपनीने या पदाकरिता रसायनशास्त्र विषयातील पदव्युत्तर पदवी (एमएससी) अहर्ता धारक विद्यार्थ्यांना ड्राईव्ह करिता बोलविले होते. या पदाकरिता एकूण २०० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. २०० पैकी ७८ विद्यार्थी परीक्षेकरिता उपस्थित होते. प्रथम परीक्षा घेतल्यानंतर कमीत कमी ५० टक्के गुण प्राप्त केलेल्या ५३ विद्यार्थ्यांची प्राथमिक फेरीत निवड करण्यात आली. दुसऱ्या फेरीत परीक्षा घेत अंतिम २२ विद्यार्थ्यांची या पदांकरिता निवड केली जाणार आहे.

शिक्षण अंतिम टप्प्यात असताना विद्यार्थ्यांना रोजगार मिळावा म्हणून माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी रोजगार व प्रशिक्षण विभाग विद्यापीठात सुरू केला. या विभागामार्फत विविध कंपन्यांचे रोजगार मिळावे, परिसर मुलाखती आयोजित केल्या जाते. इव्हेंटिस रिसर्च को. प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीला मनुष्यबळाची गरज असल्याने त्यांनी विद्यापीठाच्या प्लेसमेंट सेलसोबत संपर्क करीत रोजगार मेळावा घेण्याचे आवाहन केले. त्या अनुषंगाने दीक्षांत सभागृहात या प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन करण्यात आले. कंपनीच्या वतीने जनरल मॅनेजर (एचआर) एस.एस. नायर यांच्या नेतृत्वात सीनियर मॅनेजर (एचआर) ज्योती सावदेकर, असिस्टंट मॅनेजर गणेश राऊत यांच्या पथकाकडून ड्राईव्ह राबविण्यात आला. या कॅम्पस ड्राईव्हला मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. शिक्षण पूर्ण होताच नोकरी हातात मिळत असल्याने विद्यार्थ्यांनी देखील विद्यापीठाच्या रोजगार व प्रशिक्षण विभागाबाबत समाधान व्यक्त केले.





**वार्षिक पुरस्कार सोहळ्यात खेळाडूंचा सत्कार**

वार्षिक पुरस्कार सोहळ्यात ॲथलेटिक्स मधील सर्वोच्च कामगिरी केल्याबद्दल जिल्ह्यातील खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. नागपूर जिल्हा ॲथलेटिक्स संघटना आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ खेलो इंडिया प्रशिक्षण केंद्राच्या वतीने हा सत्कार कार्यक्रम घेण्यात आला.

कार्यक्रमात उत्कृष्ट प्रशिक्षक म्हणून ट्रॅक स्टार ॲथलेटिक्स क्लबचे रवींद्र टोंग, ट्रॅक स्टार ॲथलेटिक्स क्लबला उत्कृष्ट क्लब, उत्कृष्ट शाळा म्हणून महात्मा गांधी इंग्लिश मीडियम हायस्कूल वानाडोंगरी, वरिष्ठ महिला गटात उत्कृष्ट खेळाडू म्हणून प्राजक्ता गोडबोले, उत्कृष्ट खेळाडू म्हणून शादाब पठाण, कनिष्ठ गट मुलांमधून उत्कृष्ट खेळाडू माधव गुप्ता, कनिष्ठ गट मुलींमधून उत्कृष्ट खेळाडू जानवी हिरुडकर, बेस्ट जम्पर म्हणून निकिता सराटे, बेस्ट फ्लॉवर म्हणून रणवीर शेंडे, बेस्ट स्प्रिंटर म्हणून निकिता सराटे, बेस्ट इनडूरंस म्हणून प्राजक्ता गोडबोले यांचा सत्कार करण्यात आला.

उत्कृष्ट तांत्रिक पंच म्हणून कनिष्ठ गट पुरुष मधून भूषण धारपूरे, कनिष्ठ गट महिलांमधून प्रिया भोवते, उत्कृष्ट तांत्रिक पंच प्रा. अनिल भोरे, डॉ. शारदा नायडू, गणेश वाणी, दिपाली येरेकर, नितीन धाबेकर, प्रणाली चनोडे, मोहित राहाटे यांना विशेष पुरस्कार देण्यात आला.

३ हजार मीटर ट्रिपल चेस मध्ये कास्यपदक प्राप्त केल्याने सौरभ तिवारी, १० हजार, ५ हजार मीटर सुवर्णपदक प्राप्त केल्याने शादाब पठाण, ५ हजार मीटर सुवर्णपदक प्राप्त केल्याने प्राची गोडबोले, कास्यपदक प्राप्त केल्याने सौम्य निकाडे, मिडले रिलेत सुवर्णपदक प्राप्त केल्याने संयोगिता मिसार, सुरजीत राजभोर, प्राजक्ता गोडबोले, चैताली बोरेकर, विजयलक्ष्मी कटरे, निकिता सराटे, स्वरा हिवसे, अल्हाद राऊत, यामिनी ठाकरे, माधव गुप्ता, प्रवीण कुमार, शाहना अंजुम, आकांक्षा शेलार, भाग्यश्री महल्ले, अनुष्का बोदिले, जानवी झाडे, आर्या कोरे, भारती बोरकर, रणवीर शेंडे, नेहा ढबाले, प्रिया दोहतरे, कशीश भगत, सुर्यश्री धोंडरकर, प्रत्युषा वाकडे, जानवी हिरुडकर, देवांग हिरुडकर, आकांक्षा सौदिया, मिताली भोयर, भुनेश्वरी मसराम, आशुतोष बावणे, जानवी रेवो, अनन्या मंगर, वैष्णवी कोटपल्लीवार आदी विद्यार्थ्यांना स्मृतीचिन्ह देत सन्मानित करण्यात आले.वार्षिक पुरस्कार सोहळ्यात खेळाडूंचा सत्कार क्षेत्रात इतरांपेक्षा अधिक संधी प्राप्त होईल. उद्योग जगताला आवश्यक असलेले कौशल्य या विभागांमधून प्राप्त होत आहे. या विभागांनी गुणवत्ता रुपयांची पूर्तता करीत ती पूर्ण राखली आहे. याबाबत कोणतीही तडजोड केली नाही.

एलआयटीचे संचालक डॉ. राजू मानकर यांनी विद्यार्थी, कर्मचारी आणि प्राध्यापकांच्या अनेक वर्षांच्या परिश्रमाचे आणि परिश्रमाचे कौतुक केले. त्यांच्यामुळेच संस्थेला ही ओळख मिळाली असल्याचे ते म्हणाले. डॉ. भारत भानवसे आणि डॉ. गिरीश देशमुख यांनी एसएआरच्या तयारीसाठी केलेल्या प्रयत्नांबद्दल त्यांनी अभिनंदन केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांचे देखील नॅक आणि एनबीए मान्यतेच्या तयारीसाठी विद्यापीठ प्रशासनाने मदत केल्याने आभार मानले. एलआयटी माजी विद्यार्थी संघटना तसेच LITAA ने दिलेल्या सततच्या मदतीमुळे त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

अत्याधुनिक पायाभूत सुविधा, शास्त्रोक्त पद्धतीने चालवलेले अध्यापनशास्त्र, मजबूत उद्योग सहयोग आणि जगभरातील प्रख्यात माजी विद्यार्थ्यांसह, संस्था केवळ गुणवंत विद्यार्थ्यांनाच आकर्षित करत नाही तर त्यांच्या अखंड प्लेसमेंट समर्थनासह, त्यांना उच्च वाढीतील करिअर घडविण्यातही मदत करत असल्याचे डॉ. मानकर यांनी सांगितले. दानदाता राव बहादूर लक्ष्मीनारायणजी यांनी दाखवलेल्या मार्गाचे अनुसरण करून संस्थेचे ध्येय आणि ध्येय पूर्ण करण्याच्या दिशेने प्रत्येक भागधारक प्रयत्न करीत असल्याचे ते म्हणाले.






**शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त खेळाडूंचा सत्कार**

- विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे आयोजन
- आंतर महाविद्यालयीन आट्यापाट्या स्पर्धेत डॉ. मधुकरराव वासनिक पीडब्ल्यूएस महाविद्यालय विजयी

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या शताब्दी वर्षानिमित्त आंतर महाविद्यालयीन आट्यापाट्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यापीठ क्रीडा परिसरात गुरुवार, दिनांक २० एप्रिल २०२३ रोजी सायंकाळी या स्पर्धेचा पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. याच कार्यक्रमात शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त खेळाडूंचा देखील सत्कार करण्यात आला. डॉ. मधुकरराव वासनिक पीडब्ल्यूएस महाविद्यालयाने पुरुष व महिला गटात आंतर महाविद्यालयीन आट्यापाट्या स्पर्धा जिंकली. प्रमुख अतिथींच्या हस्ते विजयी स्पर्धकांना पुरस्कार वितरित करण्यात आले.

पुरस्कार वितरण कार्यक्रमाला आट्यापाट्या फेडरेशन ऑफ इंडियाचे सचिव डॉ. दीपक कवीश्वर, विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शरद सूर्यवंशी, डॉ. मधुकरराव वासनिक पीडब्ल्यूएस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. यशवंत पाटील, विद्यापीठाचे बॅरिस्टर शेषराव वानखेडे शिक्षण महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. विद्या भारंबे, महाराष्ट्र राज्य आट्यापाट्या महामंडळाचे सचिव डॉ. अमरकांत चकोले, आट्यापाट्या फेडरेशन ऑफ इंडियाचे माजी महासचिव डॉ. अशोक पाटील, अरुणराव कलोडे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन जंगितवार, आयडीसीपीई महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. शारदा नायडू, माधवी मार्डीकर, डॉ. अंबाडकर आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमात छत्रपती पुरस्कार प्राप्त खेळाडू प्रवीण वहाले, आलोक पांडे, भूषण गोमासे, डॉ. सौरभ मोहोड यांचा प्रमुख अतिथींच्या हस्ते विद्यापीठ शताब्दी वर्ष महोत्सवाच्या निमित्ताने क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाच्या वतीने सत्कार करण्यात आला. आंतर महाविद्यालयीन आट्यापाट्या चॅम्पियनशिप स्पर्धेत डॉ. मधुकरराव वासनिक पीडब्ल्यूएस महाविद्यालयाने पुरुष गटात बाजी मारली. आयडीसीपीई महाविद्यालय उपविजेते ठरले. डीएनसी महाविद्यालय नागपूर तृतीय तर विद्यापीठाचे बॅरिस्टर एस. के. वानखेडे शिक्षण महाविद्यालयाने चौथे स्थान प्राप्त केले. महिला गटात डॉ. मधुकरराव वासनिक पीडब्ल्यूएस महाविद्यालयाने बाजी मारत अजिंक्यपद पटकावले. आयडीसीपीई महाविद्यालय उपविजेते ठरले. तृतीय स्थान विद्यापीठाचे बॅरिस्टर एस. के. वानखेडे शिक्षण महाविद्यालयाने तर चतुर्थ स्थान दयानंद आर्या कन्या महाविद्यालयाने पटकावले. कार्यक्रमात ट्रॉफी स्पॉन्सर्ड करणारे संतोष भगत यांचा सत्कार करण्यात आला. टूर्नामेंट इन्चार्ज म्हणून डॉ. सौरभ मोहोड, अंकुश घाटे, डॉ. सुयश पंडागडे, प्रमोद नेती, प्रांकित बनसोड, सागर कैकाडे, प्रतीक कोटांगळे, चिराग बोरकर, तक्षशिला मेश्राम यांनी कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.



## विद्यापीठाच्या वुडबॉल संघाच्या खेळाडूंचा सत्कार
### - अ. भा. आंतरविद्यापीठ स्पर्धेत मिळविले पाच पदके

सुरेश ज्ञान विहार विद्यापीठाच्या यजमानपदाखाली झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ वुडबॉल स्पर्धेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या खेळाडूंनी दमदार कामगिरीसह दोन सुवर्ण, दोन रौप्य व एक कांस्यपदक जिंकण्याची कामगिरी केली आहे. या कामगिरीबद्दल विद्यापीठाच्या क्रीडा विभागाच्या वतीने विजयी खेळाडू व संघाच्या प्रशिक्षकांचा सत्कार करण्यात आला.

जयपूर येथे झालेल्या अ.भा. आंतरविद्यापीठ वुडबॉल स्पर्धेतील सांघिक स्ट्रोक प्रकारात सर्वोत्कृष्ट कामगिरी करीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने सुवर्णपदक पटकाविले. विजेत्या संघात अंजली गुजर, एकता खैरकर, इशिका सहारे, किरण सिपट, निकिता शर्मा, सरिता कपुरिया, रसिका भक्ते, सुनिता चौधरी यांचा समावेश होता. मिश्र दुहेरीच्या फेअरवे प्रकारात अनिशा रामनिवास व अमोल मुंदरे या जोडीने सुवर्णपदक पटकाविले. पुरुषांच्या सांघिक फेअरवे प्रकारात विद्यापीठाच्या ज्ञानेश्वर सावरकर, मुकेश धोजक, अमित यादव, हेमंत नेहारे, राहुल यादव, महेंद्र बुनकर, सत्यवीर, अनिल निथरवार या संघाने रौप्यपदक तर मिश्र दुहेरीच्या स्ट्रोक प्रकारात आदित्य मंत्री व नम्रतासिंग बघेल जोडीने रौप्यपदक जिंकले. पुरुषांच्या स्ट्रोक प्रकारातील एकेरीत हर्षल वानखेडेने कांस्यपदक जिंकण्याची कामगिरी केली. नागपूर विद्यापीठाच्या खेळाडूंनी डॉ. अनिल वाळके व डॉ. सुधीर कहाते यांच्या मार्गदर्शनात हे यश प्राप्त केले. त्याबद्दल पदक विजेत्या खेळाडूंचा विद्यापीठाच्या क्रीडा विभाग कार्यालयात सत्कार करण्यात आले. यावेळी क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शरद सूर्यवंशी, डॉ. सुरेखा धात्रक, डॉ. सुधीर कहाते, डॉ. अनिल वाळके, डॉ. प्रमोद नेती, डॉ. वर्षा बारोकर, सुनील फुलबांधे आदी उपस्थित होते.







**विद्यापीठ एक तीर्थस्थळ**
**माननीय राज्यपाल श्री. रमेश बैस यांचे प्रतिपादन**
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा 110 वा दीक्षांत समारंभ

ज्ञानावर प्रत्येक व्यक्तीचे जीवन अवलंबून आहे. ज्ञानाचे धन महत्वपूर्ण असून विद्यापीठ हे एक तीर्थस्थळ असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे माननीय राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती श्री रमेश बैस यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा ११० वा दीक्षांत समारंभ सिव्हिल लाईन येथील डॉ. वसंतराव देशपांडे स्मृती सभागृह येथे गुरुवार, दिनांक १३ एप्रिल २०२३ रोजी दुपारी २ वाजता संपन्न झाला. यावेळी अध्यक्षीय भाषण करताना माननीय राज्यपाल श्री. बैस मार्गदर्शन करीत होते.

विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सवी वर्षात हा दीक्षांत समारंभ होत असल्याने माननीय राज्यपाल श्री बैस यांनी विद्यार्थी, शिक्षक व पालकांचे अभिनंदन केले. आदर्श गावाच्या रूपाने नैतिक मूल्यांची शिकवण देणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या नावाने हे नागपूर विद्यापीठ असून आदर्श ग्राम संकल्पना स्थापित करण्यासाठी जीवन अर्पण केलेल्या राष्ट्रसंतांच्या स्मृतींना माननीय राज्यपालांनी अभिवादन केले. यावेळी पुढे बोलताना माननीय राज्यपाल श्री. बैस यांनी महाराष्ट्र राज्यात नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आगामी शैक्षणिक क्षेत्रापासून लागू केले जाणार असल्याचे सांगितले. नवीन शैक्षणिक धोरण लागू केल्यानंतर हे विद्यापीठ नवीन उदाहरण प्रस्थापित करेल यात शंका नाही, असे राज्यपाल म्हणाले. नवीन शैक्षणिक धोरणामध्ये नैतिक आणि भारतीय मूल्यांना चालना देण्यात आली आहे. स्वामी विवेकानंद यांच्या युक्तीप्रमाणे योग्य शिक्षण मिळाल्यास योग्य पिढी तयार होईल. अशी नीतिवान, भारतीय मूल्यांची जपणूक करेल, अशी नवीन पिढी तयार करणारे हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आहे, असे राज्यपाल म्हणाले.

नवीन शैक्षणिक धोरणात कौशल्य विकासावर भर देण्यात आला आहे. भारत हा युवा देश असून त्या तुलनेत जपान, पोर्तुगल, जर्मनी हे देश वृद्धत्वाकडे जात आहे. संपूर्ण जगाला कौशल्य प्राप्त मानव संसाधन भारत पुरवू शकतो. त्यामुळे नवीन शैक्षणिक धोरणामध्ये कौशल्य आधारित अभ्यासक्रमांना प्राधान्य देण्यात आले आहे. शिवाय राज्याने महाराष्ट्र कौशल्य विद्यापीठ स्थापन केले आहे. विद्यार्थ्यांना अधिक कौशल्यक्षम बनविण्यासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने महाराष्ट्र कौशल्य विद्यापीठासोबत सामंजस्य करार करावा असे राज्यपाल म्हणाले. देशात छोट्या कामाप्रती नकारात्मकता असल्याने मोठ्या प्रमाणात पदवीधर बेरोजगार आहेत. कोणतेही काम कमी दर्जाचे नसते. विद्यापीठाला सर्वश्रेष्ठ तसेच देशाला महान बनविण्यासाठी नवीन स्टार्टअप करण्याचे आवाहन माननीय राज्यपालांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ अत्यंत जुने विद्यापीठ असून या विद्यापीठाने माजी उपराष्ट्रपती, सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश, माजी प्रधानमंत्री, नामवंत न्यायाधीश, वकील, केंद्रीय मंत्री दिले आहेत. आर्मी चीफ मनोज पांडे हे देखील या विद्यापीठाचे विद्यार्थी आहेत. विद्यार्थ्यांनी या नामवंत माजी विद्यार्थ्यांना आपले रोल मॉडेल मानावे, असे माननीय राज्यपाल म्हणाले. नागपूर शहराला त्यांनी देशाचे हृदयस्थान संबोधले.

तत्पूर्वी मिरवणुकीने माननीय राज्यपाल तसेच अतिथींचे दीक्षांत सभागृहात आगमन झाले. राष्ट्रगीत, महाराष्ट्र गीत व विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी दीक्षांत मंचावर अध्यक्षस्थानी महामहीम राज्यपाल श्री. रमेश बैस, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद नवी दिल्लीचे अध्यक्ष डॉ. टी. जी. सिताराम, कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, राज्यपाल नामित व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. समय बनसोड, डॉ. मनोज डायगव्हाणे, डॉ. प्रमोद खेडेकर, अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी, डॉ. संजय कवीश्वर, डॉ. दत्तात्रय वाटमोडे, डॉ. प्रशांत कडू, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. प्रफुल साबळे आदी उपस्थित होते. सर्वप्रथम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी प्रास्ताविकपर भाषण केले. दीक्षांत कार्यक्रमाचे संचालन डॉ. वर्षा देशपांडे (इंग्रजी) व डॉ. कोमल ठाकरे (मराठी) यांनी केले.

### नंदीनी सोहोनी ला ७ सुवर्ण पदके

विद्यापीठाच्या हिवाळी २०२१ व उन्हाळी २०२२ परीक्षांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या १०८ गुणवंत विद्यार्थ्यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे अध्यक्ष डॉ. टी.जी. सिताराम यांच्या हस्ते पदके व पारितोषिक प्रदान करण्यात आली. यावेळी नागपूर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयाच्या नंदीनी सोहोनी या विद्यार्थीनीला बी.ए., एल.एल.बी परिक्षेत सर्वाधिक गुण प्राप्त केल्याबद्दल 7 सुवर्ण पदके व २ पुरस्कार प्रदान करण्यात आले.

### २८० पदवीधारकांना 'पीएचडी'

विद्यापीठाच्या विविध विद्याशाखांच्या आचार्य अर्थात पीएचडी (डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी) पदवी प्राप्त २८० पदवीधरांची नावे जाहीर करण्यात आली. यामध्ये विज्ञान व तंत्रज्ञान विद्या शाखेच्या ९७, वाणिज्य व व्यवस्थापन विद्या शाखेच्या ३८, मानव विज्ञान विद्या शाखेच्या ११२ आणि आंतर -विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेतील ३२ पदवीधरांचा समावेश आहे.

## कौशल्य आणि ज्ञान भविष्याचा पाया - डॉ. टी. जी. सिताराम

विद्यापीठात मिळविलेली कौशल्ये आणि ज्ञान तुमच्या भविष्याचा पाया असल्याचे प्रतिपादन अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद नवी दिल्लीचे अध्यक्ष डॉ. टी.जी. सिताराम यांनी दीक्षांत भाषण करताना केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ हे ५०० हून अधिक महाविद्यालयांसह संलग्न तसेच भारताच्या स्वातंत्र्यापूर्वी १९२३ मध्ये स्थापन झालेल्या सर्वात जुन्या विद्यापीठांपैकी एक म्हणून येथे येताना खूप आनंद होत आहे. विद्यापीठ प्रादेशिक आर्थिक विकासात आणि स्थानिक लोकांच्या आकांक्षा दत्तक घेऊन आणि प्रभावित होणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्यात सक्रियपणे सहभागी आहे. गावांमध्ये राहणारे समुदाय. भारतात, लोकांनी पिढ्यानपिढ्या पारंपारिक ज्ञानाचा समृद्ध वारसा जमा केला आहे आणि ते इतर संस्कृतींकडून देखील शिकले आहेत, असे सिताराम म्हणाले. पदवीधर विद्यार्थ्यांना आधुनिक आणि पारंपारिक ज्ञान (भारतीय ज्ञान प्रणाली) दोन्ही वापरून सामाजिक समस्यांवर नाविन्यपूर्ण उपाय शोधण्याचे त्यांनी आवाहन केले. हा ११० वा दीक्षांत समारंभ विद्यापीठासाठी आणि तुमच्यासाठी महत्त्वाचा आहे. जो करिअरचा शेवट व सुरुवातीचा बिंदू असल्याचे ते म्हणाले. विद्यार्थ्यांपासून माजी विद्यार्थ्यांपर्यंत तुमच्यासाठी एक मार्ग आहे. या विद्यापीठातून बाहेर पडून तुम्ही नवीन जगात पाऊल ठेवत असताना भावी कारकिर्दीसाठी आणि आयुष्याला त्यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. या डिजिटल युगात आपण रोमांचक काळात जगत आहोत हे आपणा सर्वांना माहीत आहे. विघटनकारी नवकल्पनांसह जग झपाट्याने बदलत आहे आणि त्याचा परिणाम आपल्या जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात होत आहे. शिक्षण क्षेत्रही त्याला अपवाद नाही. NEP 2020 च्या अंमलबजावणीमुळे शिक्षण क्षेत्राला चालना मिळाली आहे आणि उच्च शिक्षण क्षेत्रातील क्रियाकलापांना चालना मिळेल. हे आमच्या विद्यापीठांना आणि सरकारला देईल. UGC आणि AICTE सारख्या संस्था भारताला जागतिक शैक्षणिक ज्ञान महासत्ता एक महत्त्वाचा भाग असल्याचे डॉ. सिताराम म्हणाले.

उच्च दर्जाचे शिक्षण, नवोपक्रम, उद्योजकता, संशोधन आणि सामुदायिक संलग्नता केंद्रे प्रदान करणाऱ्या उच्च शिक्षणाचे मोठ्या, चांगल्या संसाधनांसह, दोलायमान बहुविद्याशाखीय क्षेत्रात रूपांतर करण्यासाठी आपण सर्वांनी शिक्षण क्षेत्रातील प्रत्येक भागधारकासह काम केले पाहिजे, असे ते म्हणाले. डिजिटल आणि कम्युनिकेशन तंत्रज्ञानाद्वारे चालवलेले व्यत्यय आणणारे इनोव्हेशन खरं तर भारताला एक नैसर्गिक फायदा देत आहे आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 ने शिक्षण क्षेत्रातील क्रियाकलापांना पुढे चालना दिली आहे. आपण माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात आघाडीवर असल्याने आणि येथे आपणास शिक्षण क्षेत्रात नेतृत्व करण्याची संधी आहे. भारतात, मोठ्या तरुण लोकसंख्येला यश मिळण्याची आकांक्षा असलेली मोठी मागणी आहे. याशिवाय, आज आमच्याकडे MOE, भारत सरकारच्या त्यांच्या AICTE आणि UGC च्या माध्यमातून सक्रिय पुढाकार घेऊन पूर्वी कधीही नव्हतो असे मजबूत धोरण आणि राजकीय पाठबळ असल्याचे ते म्हणाले.

RUSA, Skill India, IMPRINT, NPIU इत्यादी MOE चे अनेक कार्यक्रम उच्च शिक्षणातील गुणवत्ता वाढवण्यासाठी आहेत. डिजिटल इंडिया, मेक इन इंडिया, स्टार्ट अप इंडिया आणि इतर अनेक राष्ट्रीय कार्यक्रम या प्रयत्नांची प्रशंसा करत आहेत. नवीन शैक्षणिक धोरण (NEP) 2020, 1986 नंतरचे भारताचे पहिले सर्वसमावेशक धोरण, अंमलबजावणी दरम्यान असंख्य समस्यांचे निराकरण करण्याच्या अनेक संधी आहेत. NEP अंमलबजावणीद्वारे, विद्यापीठे, UGC आणि AICTE भविष्यासाठी तयार असलेल्या तरुण लोकांसह नवीन भारताचा मार्ग मोकळा करतील. AICTE ने NEP 2020 च्या माध्यमातून मातृभाषा किंवा प्रादेशिक भाषांना प्राधान्य दिले. शिक्षण मंत्रालयाने शैक्षणिक बँक ऑफ क्रेडिट देखील प्रस्तावित केला आहे, ही कल्पना महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना विविध प्रवेश आणि बाहेर पडण्याच्या पर्यायांना अनुमती देईल, असे डॉ. सिताराम म्हणाले.






# शताब्दी महोत्सव निमित्त विद्यापीठात वृक्षदिंडी

## -कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या हस्ते वृक्षारोपण

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सवी वर्षा निमित्त वृक्षदिंडी काढण्यात आली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, औषधीनिर्माण शास्त्र विभागातील राष्ट्रीय सेवा योजना तसेच जीवन विद्या मिशन नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन मंगळवार, दिनांक १८ जुलै २०२३ रोजी सकाळी करण्यात आले. यावेळी माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी व रसिका चौधरी मॅडम यांच्या शुभहस्ते वृक्षारोपण करीत कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठासोबत जीवन विद्या मिशन नागपूर देखील शताब्दी महोत्सवी वर्ष साजरे करीत आहे. हा योगायोग साधत विद्यापीठाच्या जमनालाल बजाज प्रशासकीय भवन परिसरातील मुख्य प्रवेश द्वारासमोरून वृक्षदिंडी काढण्यात आली. सोबतच १०० वृक्षांची लागवड करण्यात आली. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, रसिका चौधरी मॅडम, औषधीनिर्माण शास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रमोद खेडेकर, उद्यान अधीक्षक श्री. प्रवीण गोतमारे, जीवनविद्या मिशन मुंबई ज्ञानसाधना केंद्र नागपूरचे अध्यक्ष श्री. सतीश देशमुख, सचिव श्री. विठ्ठलराव जावळकर, कोषाध्यक्ष श्री. गजानन कुकुडकर, अंकेक्षक श्री. चंद्रकांत वाघमारे, जीडीसी श्री. दत्तूजी वराडे, ज्येष्ठ प्रबोधनकार सौ. माणिकताई पळसकर, ज्येष्ठ नामधारक श्रीमती गंगाताई ईटणकर, औषधी शास्त्र विभाग प्राचार्य डॉ. प्रकाश इटनकर, नामधारक श्री. रामचंद्र खोत, श्री. रमेश साखरकर, श्री. राजू चरडे, युवानामधारक संकेत देवघरे, वेदांत पाटील इत्यादी आणि इतर जीवनविद्या फॉलोअर्स मंडळी उपस्थित होती.

वृक्ष लागवड व संवर्धन या प्रक्रियेतून विद्यापीठाचे विद्यार्थी, समाजातील नागरिक एकत्र येऊन वृक्ष आणि पृथ्वी यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्याकरिता या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पर्यावरण हाच नारायण ही जीवन विद्या संकल्पना कार्यक्रमातून साकार झाली. यावेळी विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वारा जवळ एकत्र येत वृक्ष दिंडी परिसरातून काढण्यात आली. वृक्षारोपण स्थळी विश्व प्रार्थना म्हणण्यात आली. कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी व रसिका चौधरी मॅडम यांच्या सह उपस्थित अतिथींच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी औषधीनिर्माण शास्त्र विभागातील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक योगेश निकम अनिल बदनाले, चक्रधर चंद्रवंशी, जगदीश बनकर, सुरभी भावे, प्रतीक्षा वाघ यांच्यासह अन्य स्वयंसेवकांनी सहकार्य केले.

### यशस्वी आयुष्यासाठी जीवन कौशल्य

यशस्वी आयुष्यासाठी जीवन कौशल्य प्राप्त व्हावे म्हणून जीवनविद्या मिशनचे 'यशस्वी आयुष्याचे जीवन कौशल्य' अभ्यासक्रम विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या वतीने औषधीनिर्माण शास्त्र विभागात सुरू करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांनी त्यांच्या जीवनाचे शिल्पकार व्हावे म्हणून हा अभ्यासक्रम जीवन विद्या मिशनच्या माध्यमातून तयार करण्यात आला. औषधी निर्माण शास्त्रीय विभागातील या अभ्यासक्रमाचे संयोजक म्हणून डॉ. प्रकाश ईटणकर व डॉ. दादासाहेब कोकरे हे काम पाहत आहे. माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी व आजीवन अध्ययन व विस्तार विभाग संचालक डॉ. निशिकांत राऊत यांच्या सहयोगाने अभ्यासक्रमाला मान्यता मिळाली आहे. सर्व महाविद्यालयांनी या अभ्यासक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.




**मनुष्याचे कष्ट दूर करण्यातच परमोच्च आनंद**

- देव संस्कृती विश्वविद्यालयाचे प्र-कुलगुरू डॉ. चिन्मय पंड्या यांचे प्रतिपादन

- राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात राष्ट्रसंत व्याख्यानमाला

मनुष्याचे कष्ट दूर करण्यातच जीवनातील परमोच्च आनंद असल्याचे प्रतिपादन हरिद्वार येथील देव संस्कृती विश्वविद्यालयाचे प्र-कुलगुरु डॉ. चिन्मय पंड्या यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात शताब्दी पर्वाच्या निमित्ताने आयोजित राष्ट्रसंत व्याख्यानमालेचे चतुर्थ पुष्प गुंफतांना डॉ. पंड्या बोलत होते. जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात रविवार, दिनांक १६ जुलै २०२३ रोजी पार पडलेल्या व्याख्यान मालेचे अध्यक्षस्थान माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी भूषविले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उद्योजक सत्यनारायण नुवाल, राष्ट्रसंत अध्यासन केंद्रप्रमुख डॉ. विजयालक्ष्मी थोटे यांची उपस्थिती होती.



जीवन की खोई खुशियां कैसे लौटएं' या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ. पंड्या यांनी भारतीय वैदिक, ज्ञान परंपरेत गायत्री मंत्र हा गंभीर संदेश तसेच प्रेरणा देत असल्याचे सांगितले. मनुष्य जीवन सौभाग्याने प्राप्त होत असून त्याचे चिंतन न झाल्यास जीवन दूषित होत व्यक्तीला पशु देखील बनवते. गुरुदेव, राष्ट्रसंत यांच्याप्रमाणेच चांगले व्यक्ती होण्याकरिता स्वतःमधील चेतना जागविण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. जीवनात अशा अनेक संधी येतात. याच संधीला सौभाग्यात बदलण्याकरिता चेतना महत्त्वपूर्ण आहे. चेतना क्रांतीला जन्म देते. चेतना ही स्वीकार करण्याच्या स्थितीत असावी. चेतनेतून मनुष्यामध्ये देवत्व निर्माण झाल्यास पृथ्वीवर स्वर्ग अवतरण्याची शक्यता गुरुदेवांनी व्यक्त केली, असे डॉ. पंड्या म्हणाले. महाराष्ट्राला संत, शूर, वीरमाता यांची भूमी होण्याचा बहुमान मिळाला आहे. महाराष्ट्राला असे भरभरून मिळाले की एकाच ठिकाणी ज्ञान, शौर्य, पराक्रमाचे शिखर पहावयास मिळते, असे ते म्हणाले. या भूमीत देशाला दिशा देणारे राष्ट्रसंत होऊन गेले. शांतीकुंज येथून सुरू झालेली यात्रा गुरुकुंज येथे समाप्त होते. शांती कुंज आणि गुरुकुंज अशा दोन धारा एकत्र आल्याचे सांगत राष्ट्रसंतांच्या या भूमीत व्याख्यानाची संधी मिळाली याबाबत डॉ. पंड्या यांनी विद्यापीठाचे आभार मानले.

अध्यक्षीय भाषण करताना माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सवाच्या निमित्ताने राष्ट्रसंत व्याख्यानमालेचे आयोजन केल्या जात असल्याचे सांगितले. राष्ट्रसंतांनी त्यांच्या ग्रामगीतेतून गीतेचा अर्थात ग्राम विकासाचा सार सांगितला आहे. याच राष्ट्रसंतांच्या विचाराचा वारसा घेत विद्यापीठ ग्रामीण भागाच्या सामाजिक, आर्थिक विकासाकरिता कार्यक्रम राबवत आहे. कौशल्य, सांस्कृतिक, लीगल, उद्योजक अशा विविध घटकांना सोबत घेऊन 'चलो ग्राम की ओर' हे अभियान शताब्दी महोत्सव अंतर्गत राबविले जात आहे. या अभियानांतर्गत विविध सामाजिक संस्थांना सोबत घेत ग्रामीण भागाचा सामाजिक, आर्थिक विकास होण्याच्या दृष्टीने पावले उचलल्या जात असल्याचे त्यांनी सांगितले. समता फाउंडेशनच्या वतीने महिलांसाठी फॅशन डिझाइनिंगचे कोर्सेस मोफत चालविले जात आहे. याकरिता २० गावांची निवड करण्यात आली. अशाच प्रकारे ब्रह्मकुमारी मार्फत नशा मुक्त अभियान चालविले जात आहे. महाविद्यालयांमार्फत सरकारच्या विविध योजना नागरिकांपर्यंत पोहोचविला जात असल्याचे कुलगुरू म्हणाले. व्याख्यानमालेचे प्रास्ताविक राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासन केंद्रप्रमुख डॉ. विजयालक्ष्मी थोटे यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन करीत आभार डॉ. अमृता इंदूरकर यांनी मानले. कार्यक्रमाला माजी कुलगुरू डॉ. कमल सिंह यांच्यासह विविध प्राधिकारणी सदस्य, अधिष्ठाता, विभाग प्रमुख, अधिकारी, कर्मचारी व गायत्री परिवारातील सदस्य यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.





# 150 किलोमीटर नंतर वाहनाचा वेग 20 कि.मी. कमी करा

**समृध्दी महामार्गावरील अपघाताचे प्रमाण कमी करण्याकरिता प्रियल चौधरी व डॉ. संजय ढोबळे ह्यांच्या नाविण्यपूर्ण संकल्पना**

राज्य व केंद्र सरकारने लोकांच्या सुविधासाठी, महाराष्ट्रात व्यापार समृध्द करण्यासाठी दळणवळणाची सोय उत्तम व्हावी याकरिता नागपूर ते मुंबई समृध्दी महामार्ग तयार करण्याचा निर्णय घेतला व तो सुध्दा नागपूर ते मुंबई पर्यंत बनवून तयार आहे व पुढील कार्य अति जोरात व वेगवान पध्दतीत होत आहे. या महामार्गाचा वापर केला तर वेळेची फार बचत होते. अशा सुविधा सामान्य नागरिकांसाठी झालेल्या आहे.

समृध्दी महामार्गामुळे कमी वेळात जास्तीत जास्त प्रवास होतो तरी सध्यातरी तेथे अपघाताची संख्या वाढलेली आहे. इतकेच नव्हे तर आज समृध्दी महामार्गाचा प्रवास म्हटलं की भिती वाटते. हे आपल्याला या महामार्गावरुन होणाऱ्या अपघाताच्या संख्येवरुन स्पष्ट होत आहे. यावर शासन सुध्दा प्रयत्न करीत आहे, जेणेकरुन अपघाताची संख्या कमी होईल.

अपघाताचे मुख्यत: दोन कारणे समोर येत आहे. एक तर संमोहन (Hypnosis) व दुसरे वाहनाचे टायर फुटणे. ही दोन्ही कारणे फार महत्त्वाची दिसतात. नुकत्याच व्हीएनआयटी च्या उच्च शिक्षित विद्यार्थ्यांनी संमोहनचे कारण शोधून काढले. आपल्या क्षेत्रात होणाऱ्या अपघाताची चाहूल आपल्याच नागपूरच्या क्षेत्रामध्ये असलेल्या राष्ट्रीय स्तरावरील संशोधन संस्था म्हणजे व्हीएनआयटी यांनी ही परिकल्पना दिली व ती तेवढीच सत्य असून भयानक आहे. समृध्दी महामार्गाचा सरळ मार्ग, सिमेंटच्या रस्त्यावरुन शुभ्र पांढरा मार्ग वाहन चालकाचे मन विचलीत न करता वाहन चालविण्यास प्रवृत्त करते. त्यामुळे, वाहन चालक स्वत:चे नियंत्रण विसरुन संमोहित होतो व वाहनावरचा ताबा विचलीत होतो व अपघात होतात. यासाठी सर्व संशोधक विद्यार्थी व व्हीएनआयटी संस्थेचे अभिनंदन.




दुसरे कारण म्हणजे वाहनाचे टायर फुटणे होय. जेव्हा वाहन एकदाच सरळ दिशेने 120 किलोमिटर प्रति तास या वेगाने जाते तेव्हा, ते टायर सिमेंटच्या बनलेल्या मार्गात जात असतांना गरम होते. त्यामुळे टायर मधील हवा गरम होऊन त्याचा विस्तार होतो व अधिक दाबामुळे टायर फुटतात व हेच मोठ्या अपघाताचे कारण ठरते.

त्याचप्रमाणे अनेक काही कारण आहे त्यामुळे अपघात होतात. जसे ट्रकच्या मागे फ्लुरोसेंट टेप न लावल्याने वाहन रात्रीच्या वेळेस पुढे आहे, कळत नाही. जे वाहन रोडच्या एका बाजूला उभे आहे तेही कळत नाही. वाहनाचा वेग मर्यादेपेक्षा जास्त होणे, पोलीस नियंत्रण त्या तुलनेत कमी पडत असावे असे वाटते.

आपण फक्त अपघाताचे कारण देत राहिले तर फक्त चर्चा होतात पण उपाय सुचविणे फार महत्त्वाचे आहे. वरील अपघाताची कारणे फार मोठी आहेत. पण उपाय शोधून काढणे तेवढेच कठीण, कारण म्हणतात 'दुर्घटना से देर भली' कमी वेळात जास्त अंतर या मार्गाने काढण्यापेक्षा थोडा वेळ अजून दिला तर आपले जीवन वाचवू शकतो. तेव्हा एकच फायदा न बघता जीवन हेच सर्व काही आहे. याची प्रचिती करुन घेणे फार महत्त्वाचे वाटते. महामार्गावरील अपघात कमी व्हावे यासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर येथील दोन संशोधकांनी काही शाश्वत उपाय हे एका नाविण्यपूर्ण परिकल्पना देऊन मांडण्याचा त्यांनी प्रयत्न केला. यानुसार महामार्गावर सरळ रेषेत जेव्हा वाहन 120 किलोमिटर प्रति तास च्या वेगाने जाते तेव्हा वाहन चालक आपले मानसिक संतूलन सोडून देतो. संमोहनाचा बळी होतो. यावेळी आपण वाहन चालकाला संमोहनापासून दूर ठेवायचे असेल त्यांनी नविन संकल्पनेनुसार दर 150 किलोमिटर नंतर त्याला वाहनाचा वेग 20 किलोमिटर प्रति 2 किलोमिटरवर कमी करायला सांगणे. म्हणजे 150 किलोमिटर नंतर 120 किलोमिटर/तास वरुन 100 किलोमिटर/तास पुन्हा दोन किलोमिटर नंतर 80 व 60 व नंतर 40 किलोमिटर प्रति तास करायला सांगायला पाहिजे तसे स्पष्ट व सुंदर फलक रस्त्याच्या बाजूला लावून वाहन चालकाचे मन विचलित करणे यालाच दुसऱ्या शब्दात सांगायचे झाले तर वाहन चालकाला पूर्वीच सुचना राहील की पुढे 150 किलोमिटर नंतर असा वाहनाचा वेग कमी करायचा आहे. म्हणजे वाहन चालक संमोहित होणार नाही. वाहनाचा वेग 40 किलोमिटर/तास झाल्याचे तेथे महामार्गावर अर्धा किलोमिटरचा पाणी साचून ठेवावे. ते वाहन अर्धा किलोमिटर पाण्यातून जाईल व वाहन चालकाला वेगळा अनुभव येईल व तो मुख्यतः संमोहन मुक्त होईल. वाहन चालकाच्या संमोहन मुक्तिसोबत वाहन पाण्यातून गेल्यामुळे वाहनाचे चाके थंडे होतील व चाकातील हवेचा दाब कमी होईल. पुढे 150 किलोमिटर पर्यंत ते टायर फुटण्यापासून वाचेल. वाहन संग्रहीत पाण्याच्या बाहेर पडल्यावर त्याचा एका बाजुला प्रसाधनगृह, छोटेसे उपहारगृह तयार करावे जेणे करुन वाहन चालकाला तिथे 5-10 मिनिटे थांबवून फ्रेश होता येईल व नंतर प्रत्येक 2 किलोमिटर त्यांनी आपला वाहनाची गती 20 किलोमिटरने वाढवावी व चित्रात दाखविलेल्या नाविण्यपूर्ण संकल्पना ही प्रत्येक 150 किलोमिटर राबवावी, म्हणजे अपघात कमी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे यामार्गावर दिलेल्या चित्रानुसार प्रत्येक 150 किलोमिटर व अशी व्यवस्था केली तरी वाहन चालकाचे संमोहन पण होणार नाही व वाहनाचे चाके थंडे होवून चाके फुटणार नाही हे महत्त्वाचे.

अपघाताचे प्रमाण कमी व्हावे यासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील प्रियल एस. चौधरी व डॉ. संजय जानराव ढोबळे ह्या दोन संशोधकांनी नाविण्यपूर्ण संकल्पना देवून समृध्दी महामार्गावरील प्रवाशांना अपघातापासून दूर ठेवावे, सुरक्षित जीवन द्यावे तसेच समृध्दी महामार्गाची भिती कमी करावी हीच इच्छा दोन्ही संशोधकाची आहे हे फार महत्त्वाचे ठरते.

शासनानी सुध्दा काही उपाययोजना प्रवासाच्या वेळेत दिलेल्या आहे. याप्रमाणे समृध्दी महामार्गावर वाहनाच्या चाकामध्ये भरण्यासाठी मुफ्त नायट्रोजन गॅस, मुफ्त पंक्चर दुरुस्त करुन देणे, मार्गाच्या दोन्ही बाजूला वाहन चालकाचे मन विचलीत करण्यासाठी रंगीत झेंडे लावणे, पोलिसांचे वाहन सतत फिरत असते व पोलीस आपले लक्ष वाहनाच्या वेगावर ठेवण्याचा प्रयत्न करतात. याशिवाय आता तर समृध्दी महामार्गावर एअर ॲम्ब्युलन्स उपलब्ध करुन अपघातातील व्यक्तींना त्वरीत उपचार मिळून मृत्यूची संख्या कमी करण्याचा प्रयत्न पण केला आहे. यासाठी महामार्गावर 16 हॅलीपॅड पण उभारणार आहे, असे अनेक उपाय शासन प्रवाश्यांच्या सोईसाठी करीत आहे.

## हेक्सावेअर टेक्नॉलॉजीसचा विद्यापीठात कॅम्पस ड्राईव्ह-दीक्षांत सभागृहात आयोजित ड्राईव्हला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



हेक्सावेअर टेक्नॉलॉजीसचा विद्यापीठात कॅम्पस ड्राईव्ह-दीक्षांत सभागृहात आयोजित ड्राईव्हला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील रोजगार व प्रशिक्षण मेळाव्याच्या वतीने आयोजित हेक्सावेअर टेक्नॉलॉजीस लिमिटेड या कंपनीच्या कॅम्पस ड्राईव्हला विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला. महाराज बाग येथील दीक्षांत सभागृहात शुक्रवार, दिनांक २८ जुलै २०२३ रोजी हा कॅम्पस ड्राईव्ह पार पडला. विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली रोजगार व प्रशिक्षण विभाग विद्यापीठात सुरू करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना रोजगार मिळावा म्हणून या विभागामार्फत रोजगार मेळावे आयोजित केले जातात. या अनुषंगाने हेक्सावेअर टेक्नॉलॉजीस लिमिटेड या कंपनीच्या वतीने आंतरराष्ट्रीय व देशांतर्गत आवाज प्रक्रियेसाठी कस्टमर सपोर्ट एक्झिक्युटिव्ह या पदाकरिता ह्या मुलाखती घेण्यात आल्या. हेक्सावेअर टेक्नॉलॉजीस कंपनीच्या अधिकारी सुरुची डंभारे, अंजली जेठानी, तयबा खान यांनी विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या. यावेळी प्रशिक्षण व रोजगार अधिकारी डॉ. भूषण महाजन उपस्थित होते. या कंपनीच्या मुलाखतीकरिता एकूण ८१७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. शुक्रवारी झालेल्या मुलाखतीकरिता २१७ विद्यार्थी उपस्थित झाले होते. यामधून ५५ विद्यार्थ्यांची प्राथमिक स्तरावर निवड करण्यात आली आहे. प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांची अंतिम निवड करीता मुलाखत घेतली जाणार आहे. त्यामधून विद्यार्थ्यांची निवड या पदाकरिता केली जाईल. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र- कुलगुरू डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी अभिनंदन केले.

## आंतर महाविद्यालयीन स्पर्धा अधिक बळकट करा - माजी रणजीपटू हेमंत वसू
## विद्यापीठाचा वार्षिक पुरस्कार वितरण सोहळा







सर्वोत्कृष्ट खेळाडू घडवायचे असेल तर आंतर महाविद्यालयीन स्पर्धा अधिक बळकट करा, असे प्रतिपादन माजी रणजीपटू श्री. हेमंत वसू यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा वार्षिक पुरस्कार वितरण सोहळा अंबाझरी रोडवरील गुरुनानक भवन येथे गुरुवार, दिनांक २७ जुलै २०२३ रोजी पार पडला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून वसू बोलत होते.

क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग, विद्यार्थी विकास विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी होते. यावेळी मंचावर प्रमुख अतिथी म्हणून माजी रणजीपटू श्री. हेमंत वसू, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग संचालक डॉ. शरद सूर्यवंशी, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. सोपानदेव पिसे, विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. मंगेश पाठक आदी उपस्थित होते. शालेय शिक्षण घेत असतानाच खेळाची आवड निर्माण झाली. विद्यापीठाचे मैदान जवळच असल्याने प्रत्येक स्पर्धा आवर्जून बघत होतो. विद्यापीठाच्या सुभेदार हॉलमध्ये भारताचे माजी क्रिकेट संघाचे कर्णधार मोहम्मद अझरुद्दीन यांच्यासह अन्य नामवंत खेळाडू मध्य क्षेत्रिय सामन्यादरम्यान थांबले असल्याची माहिती श्री. वसू यांनी पुढे बोलताना दिली. पूर्वी आंतर महाविद्यालय स्पर्धेदरम्यान खेळाडूंसोबतच दोन्ही महाविद्यालयांचे विद्यार्थी आपल्या संघाला प्रोत्साहन देण्यासाठी उपस्थित राहत. वर्तमान स्थितीत महाविद्यालयीन स्पर्धा होताना दिसत नाही, अशी खंत वसू यांनी व्यक्त केली. क्लब हे व्यावसायिक झाले असून तेथून आलेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालय तसेच विद्यापीठाविषयी आस्था राहत नाही. त्यामुळे स्वतःच्या जिद्दीवर आंतर महाविद्यालयीन स्पर्धांमधून नवीन खेळाडू घडावे असे ते म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना डॉ. शरद सूर्यवंशी यांनी २०१२ पासून तीनही विभागांचा एकत्रितपणे हा कार्यक्रम राबविला जात असल्याचे सांगितले. प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी तेथील खेळाडूंचा सत्कार व्हावा अशी सूचना माननीय कुलगुरूंनी केली. त्यामुळे येथे केवळ नागपूर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. वर्धा भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यातील कार्यक्रम त्यांच्या ठिकाणी होतील, असे ते म्हणाले. शिवाय विद्यापीठातील खेळाडूंनी केलेल्या कामगिरीची माहिती त्यांनी दिली. मार्गदर्शन करताना प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी तीनही विभागातील उत्कृष्ट कामगिरी केलेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करीत असताना विद्यार्थ्यांना चांगल्या सुविधा मिळणे आवश्यक आहे. स्पर्धेच्या ठिकाणी जाता यावे म्हणून त्यांना आरक्षण मिळावे याबाबत निर्णय घेण्यात आला. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीतून जिद्दीच्या जोरावर खेळाडू तयार होतात. त्यांची निगा घेणे हे विद्यापीठाचे कर्तव्य असल्याचे ते म्हणाले. तळागळातून उत्कृष्ट खेळाडूंची निवड केल्यास 'रीच टू अनरिच' उपक्रम यशस्वी होईल, असे ते म्हणाले.

अध्यक्षीय भाषण करताना माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी विविध स्पर्धांमध्ये विद्यापीठाचा नवलौकिक वाढविणाऱ्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले. पुरस्कार राशीत वाढ करण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला. त्यामुळे आकडे व रक्कम वाढली. शिक्षण घेत पुढे जाणाऱ्यांकडे समाजाचे लक्ष असते. मात्र, क्रीडा सांस्कृतिक क्षेत्रातील विद्यार्थी विद्यापीठाचा नावलौकिक वाढवितात. क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्राच्या विकासात त्यांचे योगदान असते. त्यांच्याकडे काळजीपूर्वक लक्ष देणे गरजेचे आहे. क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रातील विद्यार्थ्यांची प्लेसमेंटची टक्केवारी जास्त असते. क्षमता वाढ यातून निर्माण होत असून नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात देखील यावरच भर देण्यात आला आहे, असे कुलगुरू म्हणाले. विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सवी



वर्षात १०० खेळाडूंना प्रतीमाह ५ हजार रुपये आर्थिक मदत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. कोच नसल्याने स्पर्धा होत नाही. याकडे लक्ष देत सेवाभावी कोच तयार करण्यात आले. खेळाडूंकरिता जागतिक स्तरावरील सिंथेटिक ट्रॅक तयार होत आहे. शिवाय आगामी काळात भव्य असे इनडोअर स्टेडियम तयार होणार आहे. प्रत्येक जिल्ह्यात खेळाच्या सुविधा विद्यार्थ्यांना उपलब्ध व्हाव्यात यासाठी प्रयत्न करणार असल्याचे कुलगुरू म्हणाले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. सोनाली शिरभाते, डॉ. नितीन जांगिटवार, डॉ. आदित्य सोनी यांनी केले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने प्रशिक्षक, प्राचार्य, शिक्षक तथा खेळाडू उपस्थित होते.

**खेळाडू-प्रशिक्षकांचा सन्मान**

क्रीडा विभागातून धरमपेठ एम. पी. देव विज्ञान महाविद्यालय नागपूरची विद्यार्थिनी कु. जानवी कडू हिला ३ वर्ष मिळून एकूण ७२ हजार रुपयांचा रोख पुरस्कार मिळाला. महिला महाविद्यालय नागपूरची विद्यार्थिनी कु. प्राजक्ता गोडबोले हिला एकूण ५२ हजार रुपये, कस्तुरी ताम्हणकर हिला ४७ हजार रुपये, डॉ. आंबेडकर कॉलेज नागपूरची कु. ऋतुजा तळेगावकर हिला ४४ हजार रुपये, सरस्वती




महाविद्यालय कोराडी येथील कु. अल्फिया पठाण ४० हजार रुपये, श्री. बिंझानी सिटी कॉलेज नागपूरची कु. शुभांगी राऊत हिला २७ हजार रुपये असे रोख पुरस्कार देण्यात आले. यावेळी प्रा. मनोज आंबाडकर, डॉ. श्रीराम आगलावे, डॉ. सुधीर कहाते, डॉ. अशोक कापटा, डॉ. झाकीर खान, डॉ. प्रवीण लांबखेडे, गणेश पुरोहित, निलेश राऊत, डॉ. पौर्णिमा कापटा, डॉ. तेजसिंग जगदळे, उपेंद्र वर्मा, डॉ. अनिल वाळके, स्नेहल भगत, प्रफुल गजभिये, डॉ. इंद्रजीत रंधावा, डॉ. धीरज भोसकर, डॉ. मीना बालपांडे, डॉ. विवेक साहू, डॉ. चेतन महाडिक, राकेश बनसोड, परेश देशमुख, डॉ. नितीन जांगितवार आदी प्रशिक्षक, व्यवस्थापक यांचा सन्मान करण्यात आला.

## 'सायबर सेक्युरिटी'ला आयआयटी कानपूरची साथ

### राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील स्टार्टअप

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील स्टार्टअप 'सायबर सेक्युरिटी'ला आयआयटी कानपूरची साथ मिळाली आहे. आयआयटी कानपूरने निवड केल्याने विद्यापीठातील स्टार्टअपला संपूर्ण देशात ओळख मिळणार आहे. तब्बल २५ हजार अर्जांमधून आयआयटी कानपूरने या स्टार्टअपची निवड केली आहे. सायबर ईरा (cyber 3ra) अशा या नवीन स्टार्टअपने संगणकीय ऑनलाइन नेटवर्क प्रणालीच्या सुरक्षेचा विडा उचलला आहे.

झारखंड राज्यातील रांची येथील मूळ निवासी असलेला आदर्श कांत या विद्यार्थ्याने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ संलग्नित नागपूर येथील रायसोनी अभियांत्रिकी महाविद्यालयातून शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर आदर्श कांत या विद्यार्थ्याने व्हिएनआयटी नागपूर येथील लक्ष्मीधर गावपांडे यांच्यासोबत सायबर सिक्युरिटी स्टार्टअप सुरू केले. आदर्श व लक्ष्मीधर यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या इंक्युबॅशन केंद्रामध्ये 'सायबर सिक्युरिटी (cyber 3ra) ही नवीन संगणकीय सुरक्षा प्रणाली विकसित केली. सद्यस्थितीत सर्वच क्षेत्रांमध्ये ऑनलाईन सुविधा दिल्या जात आहे. यामध्ये होत असलेल्या आर्थिक व्यवहारावर सायबर हल्ला होण्याची अधिक शक्यता असते. सायबर हल्ल्याचा धोका कमी करण्याच्या दृष्टीने सायबर सिक्युरिटी ही प्रणाली उपयुक्त ठरणारी असल्याचे आदर्श कांत याचे म्हणणे आहे. सायबर सुरक्षा प्रकारातील ही नवीन प्रणाली विकसित करण्याकरिता इनक्युबॅशन केंद्राची स्टार्टअपला मदत मिळाल्याने विद्यार्थ्यांनी विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, नवोपक्रम, नवसंशोधन व उपक्रम मंडळ संचालक डॉ. राजेश सिंह, इंक्युबॅशन केंद्र संचालक डॉ. अभय देशमुख यांचे आभार मानले.



#### देशात सर्वात मोठी सायबर आर्मी

सरकारी तसेच विविध आस्थापनांवर होणारे सायबर हल्ले लक्षात घेता देशात सर्वात मोठी सायबर आर्मी निर्माण केली जात आहे. सायबर ईरा या प्रणाली अंतर्गत देखील देशभराच्या विविध भागातील तब्बल १२०० इथिकल हॅकर्स सुरक्षेच्या दृष्टीने काम करणार आहे.

#### सायबर सेक्युरिटीचे प्रशिक्षण

सायबर सेक्युरिटी या स्टार्टअपने पिनॅकल, टेली सर्विसेस, ग्लोबल एज्युकेशन आदी कंपन्यांसोबत काम केले आहे. सोबतच या स्टार्टअपने रिझर्व बँक ऑफ इंडिया, महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक, सीआरपीएफ, ऑर्डनन्स फॅक्टरी आदी आस्थापनांना सायबर सुरक्षेबाबत आधुनिक प्रशिक्षण दिले आहे.

## एनईपी मधील शिक्षणात भारतीय ज्ञान परंपरेचा सुगंध - सुकाणू समिती सदस्य डॉ. मुरलीधर चांदेकर
## विद्यापीठात नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर कार्यशाळा







नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार तयार करण्यात आलेल्या शिक्षणात भारतीय ज्ञान परंपरेचा सुगंध असल्याचे प्रतिपादन सुकाणू समिती सदस्य तथा माजी कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आणि विद्यापीठ शिक्षण मंच यांच्या संयुक्त विद्यमाने अंबाझरी रोडवरील गुरुनानक भवन येथे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर गुरुवार, दिनांक २७ जुलै २०२३ रोजी कार्यशाळा पार पडली. 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण : जाणीव व जागृती' या विषयावर आयोजित कार्यशाळेत माहिती देताना डॉ. चांदेकर बोलत होते.

कार्यशाळेला प्रमुख अतिथी म्हणून सुकाणू समिती सदस्य म. रा. तथा माजी कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर तर विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी हे अध्यक्षस्थानी होते. यावेळी मंचावर प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे, अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघाच्या राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ. कल्पना पांडे, अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी, डॉ. संजय कवीश्वर, डॉ. शामराव कोरेटी, डॉ. प्रशांत कडू, शिक्षण मंचचे महामंत्री डॉ. सतीश चाफले यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. चांदेकर यांनी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण घोषित होऊन तीन वर्ष झाले असून त्यावर अंमल करण्यासाठी राष्ट्रीय, राज्य, जिल्हा असा कार्यक्रम घोषित करण्यात आला असल्याचे सांगितले. एनईपी सप्ताह २४ ते २९ जुलै दरम्यान राबविला जात आहे. एनईपीच्या घोषणेपासून ४ समितांचे अहवाल सरकारने मान्य केले. त्यावर अंमलबजावणी सुरू झाली आहे. ६ डिसेंबर २२ रोजी सुकाणू समिती गठीत झाली. २०२३-२४ शैक्षणिक सत्रा-पासून एनईपीवर अंमल होणार असल्याने दुसऱ्यांदा चर्चा सुरू झाली आहे. शंका तेव्हाही होती आणि आताही आहे. मात्र, मनापासून स्वीकार केल्यास प्रत्येक गोष्ट शक्य आहे. यादरम्यान १९८६ मध्ये आलेली आणि एनईपी या दोन्ही शिक्षण पद्धतीवर चर्चा झाली. भारतीय ज्ञान परंपरेची पुनर्स्थापना व्हावी म्हणून एनईपीवर अंमल झाला पाहिजे, असे डॉ. चांदेकर यांनी सांगितले.




पूर्वी गुरुकुल प्रणालीत संस्काराच्या अपेक्षेने मुलांना पाठविले जात होते. गुरुकुलात मुलगा शिकून परत आल्यानंतर आई-वडिलांना त्याच्याप्रती आदर तसेच अपेक्षा होती. आई-वडिलांना आजही ती अपेक्षा कायम आहे मात्र आदर उरलेला नाही. गुरुकुलात विषय, व्यक्तिमत्व तसेच सर्वांगीण विकासाचे शिक्षण मिळत होते. गुरुकुलातील शिक्षणानंतर नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर करून रोजगार उपलब्ध होत समाज उभा राहिला. आता गुरुकुल नाही म्हणून मुलांना होस्टेलला पाठवले जाते. होस्टेल मधून परत आल्यानंतर मुलांचे संस्कार उफाळून येतात. अशावेळी घरीच त्याला शिस्तीत रहा असे सांगावे लागते. गुरुकुलातील शिक्षणाच्या सुगंधाचा विसर आपणास पडला आहे. त्यामुळे अपेक्षित परिणाम मिळत नसल्याचे डॉ. चांदेकर म्हणाले. जुनी शिक्षण पद्धत बंद




झाली नाही, तर ती परकीय आक्रमणाने बंद पडली. गुरुकुल भारताचा सांस्कृतिक वारसा होता. हा सांस्कृतिक वारसा नष्ट झाल्याने समाज उभा राहू शकला नाही. या शिक्षणामधून राष्ट्र तसेच समाजासाठी उभे राहणारे व्यक्तिमत्वाचा अपेक्षित विकास झाला नाही. सोबतच भारतीय ज्ञान परंपरा पुनर्स्थापित करण्याचा प्रयत्नही झाला नाही. सर्व शिक्षण भौतिकेतेकडे चालले असल्याचे डॉ. चांदेकर म्हणाले. मनुष्य निर्माणाची संधी देणारे शिक्षण असावे, असे स्वामी विवेकानंद म्हणत. सोबत मनुष्य निर्मितीत रोजगाराची जोड देणारे शिक्षण देण्याची आज गरज आहे. मनापासून स्वीकारणार नाही तोपर्यंत एनईपी सोपी वाटणार नाही. सर्वच क्षेत्रात भारत स्वावलंबन व्हावा. रोजगार निर्मितीक्षम नवीन पिढी तयार व्हावी. तरुणाईचे संपत्तीत रूपांतर व्हावे म्हणून वर्तमान काळात एनईपीची गरज आहे. सोबतच नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील विविध बारकावे डॉ. चांदेकर यांनी समजावून सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षण मंचचे महामंत्री डॉ. सतीश चाफले यांनी केले. संचालन डॉ. अमृता इंदूरकर यांनी केले तर आभार अधिष्ठाता डॉ. संजय कवीश्वर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपकुलसचिव डॉ. राजेंद्र उतखेडे व सहाय्यक

कुलसचिव संजय भोयर यांच्यासह कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाला नागपूर जिल्ह्यातील प्राचार्य, प्राध्यापक, नोडल अधिकारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**ज्ञानपरंपरेचा वारसा सांगितला पाहिजे-** डॉ. कल्पना पांडे आपणास भारतीय संस्कृतीत ज्ञान परंपरेचा मोठा वारसा लाभलेला आहे. भारतीय ज्ञान परंपरेचा हा वारसा आपण भविष्यातील पिढीला सांगितला पाहिजे, असे प्रतिपादन अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघाच्या राष्ट्रीय उपाध्यक्ष तथा अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक प्रकोष्ठ प्रमुख डॉ. कल्पना पांडे यांनी केले. पायथागोरस प्रणाली भारतीय ज्ञान परंपरेचा भाग आहे. रामायण काळात डिसिबल पॅटर्नचा उपयोग होता. शिवाय क्रमांक प्रणाली तसेच भूगोलामध्ये देखील भारतीय निष्णात होते. त्यामुळे जुना भारत कसा होता हे नवीन पिढीला सांगावे लागणार आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये याच भारतीय ज्ञान परंपरेचा समावेश केला आहे. मेकॉलेने भारतीय शिक्षण पद्धती उध्वस्त केली. त्याने केवळ कारकून तयार केले, असे देखील त्या म्हणाल्या.

**लोकांमध्ये जाणीव निर्माण व्हावी** - डॉ. संजय दुधे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाबाबत समाजात व्यापक प्रमाणात जनजागृती केली जात आहे. एनईपी बाबत महाविद्यालय स्तरावर कार्यक्रम आयोजित केले जाणार असून लोकांमध्ये जाणीव निर्माण व्हावी, असे प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे म्हणाले. नागपूर जिल्ह्यातील प्राचार्य, शिक्षक, नोडल अधिकारी यांच्याकरिता या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. भंडारा व गोंदिया या जिल्ह्याचा कार्यक्रम जे.एम. पटेल महाविद्यालयात शुक्रवारी होणार असल्याचे त्यांनी सांगितले. व्यापक प्रमाणात जनजागृती करण्याकरिता पालक सभा, रॅली, दिंडी, पोस्टर्स स्पर्धा, नाट्य स्पर्धा आदी विविध कार्यक्रम घेता येतील असे डॉ. दुधे म्हणाले.

**स्वावलंबी बनविणारे असावे शिक्षण** - डॉ. सुभाष चौधरी शिक्षण हे ज्ञान क्षमता वाढविणारे तसेच स्वावलंबी बनविणारे असावे, असे प्रतिपादन माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी अध्यक्षीय भाषण करताना केले. अमेरिका, चीन, जपान, फ्रान्स यासारख्या विकसित देशांमध्ये मातृभाषेतून शिक्षण दिले जाते. मातृभाषेतून दिलेले शिक्षण अधिक उपयोगी ठरते. त्यामुळे एनईपीत याचा विचार केला आहे. एनईपीने भाषेचे बंधन हटविले आहे. कृती, प्रात्यक्षिक, नाविन्यता आदी विविध कृतीतून व्यक्तिमत्व विकास करणारे शिक्षणावर एनईपीत भर देण्यात आला आहे. ग्राम अर्थात समाजाचा विकास करणारे शिक्षण कसे असावे याचे उत्तम उदाहरण राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी ग्रामगीतेत दिले आहे. एनईपी त्याच्याशी मिळती जुळती असल्याचे डॉ. चौधरी म्हणाले.




## युवक देशाचे भावी नेतृत्व - ॲड. नीरज जावडे

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयात Y-20 चर्चासत्र




युवक हे देशाचे भावी नेतृत्व असल्याचे प्रतिपादन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे अधिसभा सदस्य ॲड. नीरज जावडे यांनी केले. विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयात युवकांसाठी असलेल्या Y-20 या चर्चासत्राचे आयोजन बुधवार, दिनांक २६ जुलै २०२३ रोजी सकाळी ११ वाजता करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून ॲड.जावडे बोलत होते.

